सत्यं शिवं सुन्दरम्

# The Maharaja Sayajirao University of Baroda, Vadodara

Title

# *Navvadottari Gomantakiy Marathi Katha: Ek Chikitsak Abhyas (Pratinidhik Kathakaranchya Kathanchya Anushangane)*

Thesis Submitted for the partial fulfilment for the award of Doctor of Philosophy (Ph.D.) in Marathi Language & Literature


Submitted by:

Purva Pandit Vasta

M.A., B.Ed.

Assistant Professor, Marathi Discipline, Goa University

Under the Guidance of

Sanjaykumar Karandikar, Ph.D.

Professor & Head

Dept. of Marathi Language & Literature Faculty of Arts

The Maharaja Sayajirao University of Baroda,


September 2024

THE MAHARAJA SAYAJIRAO UNIVERSITY OF BARODA
सत्यं शिवं सुन्दरम्


# द महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा सयाजीगंज, वडोदरा (गुजरात)


मराठी विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

शीर्षक

# ‘नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास (प्रातिनिधिक कथाकारांच्या कथांच्या अनुषंगाने)’


अभ्यासक

पूर्वा पंडित वस्त

एम्. ए., बी. एड्.

मराठी अध्ययनशाखा, गोवा विद्यापीठ

मार्गदर्शक

संजयकुमार करंदीकर, पीएच्. डी.

प्रोफेसर व प्रमुख मराठी विभाग,

फॅकल्टी ऑफ आर्टस् महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा,

वडोदरा- गुजरात


सप्टेंबर - 2024

# प्रतिज्ञापत्र

मी पूर्वा पंडित वस्त प्रतिज्ञापूर्वक असे नमूद करते की, महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा, वडोदरा-गुजरात, फैकल्टी ऑफ आर्टस् च्या मराठी विभागांतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरिता सादर केलेला 'नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास (प्रातिनिधिक कथाकारांच्या कथांच्या अनुषंगाने)' हा शोधप्रबंध मी स्वतः प्रो. डॉ. संजयकुमार करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. आवश्यक तेथे पूर्वसूरींच्या मतांची ऋणनिर्देशपूर्वक नोंद केली आहे.

प्रस्तुत शोधप्रबंध मी इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीकरिता सादर केलेला नाही.

दिनांक:

अभ्यासक

पूर्वा पंडित वस्त

# मनोगत

'गोवा' या प्रदेशात मी जन्मले. या प्रदेशाने मला जगणे शिकविले. या प्रदेशाच्या निसर्गाच्या कुशीत वाढत असताना इथल्या मातीतील कला, इथल्या जीवनावर निर्माण झालेले साहित्य याचा आस्वाद घेत असताना एक अभिरुचीसंपन्न मन या प्रदेशाने घडविले. घरात कोंकणी भाषिक असले तरी या मातीत रुजलेल्या बहुभाषिक संस्कृतीच्या अस्मितेत मी वाढले. मराठी अभंग, गीतांची आवड असलेल्या कुटुंबीयांमुळे गोमंतकाच्या मराठी संस्कृतीशी लहानपणापासून समरस होत गेले. प्राथमिक शिक्षण मराठी शाळेत झाल्यामुळे व आईलाही मराठी भाषेची व त्या स्वतः शाळेत शिकत असताना मराठी या विषयाची आवड असल्यामुळे मराठी विषयाची गोडी विशेषतः तिनेच लहानपणी लावली आणि पुढे लाभलेल्या शिक्षकांमुळे भाषेविषयीची आवड वाढतच केली.

शिक्षकीय कारकीर्दीची सुरूवात गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागात झाली. प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्याने साहित्य व संशोधन या विषयाचे महत्त्व समजत गेले. साहित्याची आवड होतीच पण प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात असताना साहित्याची व संशोधनाची गरज पदोपदी लक्षात आली. गोवा विद्यापीठातील ज्येष्ठ निवृत्त प्राध्यापक वर्ग व मी विद्यार्थिनी असताना लाभलेल्या प्राध्यापक वर्गाकडून संशोधन कार्य अविरत चालू होते आणि त्यामुळे मराठी संशोधन क्षेत्रात कार्य करण्याची जबाबदारी आपली असल्याचे लक्षात आले. मराठी संस्कृती नांदत असलेल्या गोव्यास समृद्ध अशी साहित्य परंपरा लाभल्याने व कथा हा माझा अत्यंत आवडीचा व जिव्हाळयाचा विषय असल्याकारणाने गोमंतकीय मराठी साहित्यविश्वात नव्वदोत्तरी कालखंडात बऱ्याच प्रमाणात कथेच्या प्रांतात भर पडलेली जाणवली. गोव्यातील नव्वदोत्तरी प्रश्नांना कवेत घेणारी, साधी, सरळ पण ओघवत्या शैलीत नव्वदोत्तरी गोमंतकाशी जुळलेल्या नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा अभ्यास होणे आवश्यक वाटल्याकारणाने शेवटी 'नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास (प्रातिनिधिक कथाकारांच्या कथांच्या अनुषंगाने)' असा विषय घेत या विषयावर कार्य करायचे असल्याचे शिक्कामोर्तब झाले. मागच्या साडेतीन वर्षात या विषयाचा सांगोपांग धुंडाळा घेण्याचा प्रयत्न केला.

या संशोधन प्रवासात अनेकांचा हातभार लाभला. अनेकांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनामुळे विषयाचा अभ्यास चांगल्या पद्धतीने पार पाडण्यास मदत झाली. या प्रवासात सुरूवातीपासून सोबत चालत मार्गदर्शन करणारे माझे मार्गदर्शक व गुरुस्थानी असलेले प्रोफेसर डॉ. संजयकुमार करंदीकर सरांचे आभार मानण्यापेक्षा

ऋणात राहणे पसंत करेन. गोव्यातून बडोद्यातील विद्यापीठात पीएचडी पदवीसाठी नोंदवणे हा विचार करणे कठीण होते. पण सरांनी आपल्या अत्यंत शांत व संयमी स्वभावाने सर्व तंत्रिक गोष्टी स्वतः सांभाळत नोंदणीसाठी मदत केली. त्यानंतर निवडलेला विषय कशा पद्धतीने पुढे जाऊ शकेल, विषयासाठी लागणारी साधनसामग्री, संदर्भ ग्रंथ, लिखाणानंतर वेळोवेळी सरांकडून विषयाबद्दल मिळणाऱ्या टिपा टिपण्या, तसेच कधी कौतुकाची थाप तर कधी काम मागे पडताना पदोपदी पुढे जाण्यास आपला संयमी स्वभाव ढळू न देता दिलेली प्रेमळ धाक, या सगळयातून सरांच्या मार्गदर्शनामुळे हा प्रवास खूप सुखकर झाला. आदरणीय प्रोफेसर करंदीकर सरांना सर्वप्रथम माझे वंदन. गोवा विद्यापीठात कार्यरत असल्यामुळे अभ्यासाला गती मिळावी म्हणून माझ्या संशोधनकार्यासाठी मला सहा महिन्यांची अभ्यास रजा मंजूर केल्याने मी गोवा विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. हरिलाल मेनन, कुलसचिव प्रोफेसर डॉ. व्ही. एस. नाडकर्णी, आमच्या महाशाळेच्या अधिष्ठाता प्रोफेसर डॉ. अनुराधा वागळे, उपाधीष्ठाता (शैक्षणिक) प्रोफेसर डॉ. वृषाली मांद्रेकर, उपाधीष्ठाता (संशोधन) डॉ. प्रकाश पर्येकर यांचे मी विशेष आभार मानते.

सहा महिन्यांची रजा मंजूर झाल्यानंतर विद्यापीठातील माझ्या जबाबदाऱ्या स्वतःवर घेत मला अनेक जबाबदाऱ्यांपासून मुक्त करत मला दिलेल्या सहकार्यामुळे व वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे मी मराठी अध्ययनशाखेचे संचालक प्रा. विनायक बापट, प्राध्यापकवर्ग डॉ. सुनिता उम्रस्कर, डॉ. विनय मडगांवकर, प्रा. चिन्मय घैसास, डॉ. हेमंत अय्या, प्रा. जयेश गांवकर यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच. मराठी भाषेची आवड निर्माण करणाऱ्या माझ्या शाळेतील शिक्षिका सौ. दीपा भांडणकर, पुढे महाविद्यालयात व गोवा विद्यापीठात मराठी साहित्याची व संशोधनाच्या व्यापकतेची ओळख घडवून आणणारे प्राध्यापक वर्ग प्रा. आशा मनगुटकर, डॉ. अशोक मनगुटकर, डॉ. बाळकृष्ण कानोळकर, डॉ. सुनीता उम्रस्कर, डॉ. गीता येर्लेकर, डॉ. विनय मडगांवकर या प्राध्यापकांचे मी अत्यंत ऋणी आहे. महाविद्यालयात लाभलेले गुरुवर्य डॉ. हेमंत अय्या यांच्याकडून मिळालेली प्रेरणा, त्यांचे लाभलेले सततचे मार्गदर्शन, अडल्या-नडल्या ठिकाणी वेळप्रसंगी स्वतः हात धरून तारणारे, सरांकडून मिळणारे मार्गदर्शन, आपुलकी व सोबत सरांची सहचारिणी सौ. सुश्मिता देसाई यांच्याकडून मिळणारे प्रेम यासाठी शब्द तोकडे पडावेत.

माझ्या या प्रवासात माझा भरभक्कम आधार म्हणजे माझे कुटुंबीय. मी चांगली शिकावे म्हणून लहानपणापासून जातीने लक्ष देणारी माझी आई व माझ्या शिक्षणासाठी रात्रंदिवस कष्ट करणारे माझे बाबा. स्वतःसाठी न जगता आम्हा मुलांसाठी जगणारी ही माझी दोन दैवते, आई सौ. वृंदा वस्त व बाबा श्री. पंडित वस्त

यांचा आशीर्वाद व भरभरून प्रेम सदैव मिळो ही प्रार्थना. माझा भाऊ प्रतीक माझ्यापेक्षा लहान असला तरी कधी मोठा भाऊ बनत मला योग्य वाट दाखवतो याचे खरंतर खूप अप्रूप आहे. आपली नात प्राध्यापक असल्याचा अभिमान बाळगणारे आजोबा श्री. देवेंद्र वस्त यांच्यामुळे अजून खूप कार्य करण्याची ऊर्जा मिळते व माझे अख्खे कुटुंब हे माझे ऊर्जास्रोत असल्याचे वाटते. या संशोधनाच्या प्रवासात एका नव्या कुटुंबाची भर आयुष्यात पडली व या कार्यात माझा पाठीराखा व भक्कम आधार बनले श्री केवल नाईक. त्यांची साथ मला अशीच मिळणार हे माझं खूप मोठा बळ आहे. त्याचबरोबर सदैव प्रोत्साहन देणारे माझे होणारे सासू-सासरे सौ. करिष्मा नाईक व श्री कृष्णनाथ नाईक व लहान बहिणीसमान असलेली कु. कृतीक्षा या सर्वांची या ठिकाणी मी कृतज्ञता व्यक्त करते.

मला लाभलेला खूप मोठा मित्रपरिवार ज्यांना माझी पीएचडी लवकर पूर्ण होणार हा त्यांचा माझ्यावरचा विश्वास माझ्यापेक्षाही जास्त, अशा माझ्या मित्र-मैत्रिणी स्नेहा देसाई, सुप्रिया काणकोणकर, सोनिया गडकर, मनीषा गावडे, राधिका नागवेकर, सिद्धी सावर्डेकर, सुष्मिता मोपकर, दत्तराज नाईक, अंजली नाईक, मंगेश हरिजन या मित्रमंडळींमुळे सततचे पाठबळ लाभले. आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे माझ्यावर खूप माया करणारे विद्यार्थी ज्यांनी या सगळ्या प्रवासात खूप सकारात्मकता दिली. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकारांचा अभ्यास करत असताना या कालखंडात लिहिणारे विठ्ठल गांवस, दयाराम पाडलोस्कर, नारायण महाले, चंद्रकांत गावस, उदय नाईक, गजानन देसाई, मिलिंद म्हामल अशा काही कथाकारांसोबत झालेल्या बोलण्यातून सापडलेले अनेक धागेदोरे संशोधनातही महत्त्वाचे ठरले. मुद्रणात असलेले अनेक दोष मुद्रितशोधनातून दूर करणाऱ्या सौ. वैशाली नवघरे, संदर्भ ग्रंथांचा व आधार ग्रंथांची शोधाशोध करताना गोवा विद्यापीठाचे वाचनालय कर्मचारी व गोवा विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. संदेश देसाई, कृष्णदास शामा मध्यवर्ती वाचनालय पणजी, तालुका वाचनालय कुडचडे येथील ग्रंथपाल व कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले त्यामुळे त्यांचे इथे आभार मानते.

माझे ग्रामदैवत, गावाचा राखणदार पुरुषम्हारू, कुलदैवत भगवती – बेताळ यांचा वरदहस्त माझ्यावर असल्याचे मी मानते. या दैवतांना वंदन करत, सर्वांच्या सहकार्यामुळे, भरभरून मिळणाऱ्या आशीर्वाद व प्रेमामुळे मी हे संशोधन कार्य पूर्णत्वास नेत आहे. आपणा सर्वांचे प्रेम, आशीर्वाद व भावी संशोधन कार्य करण्याचे बळ व प्रेरणा ईश्वराकडून सदैव प्राप्त होवो हीच मनोकामना.

दिनांक: - पूर्वा पंडित वस्त

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास (प्रातिनिधिक कथाकारांच्या कथांच्या अनुषंगाने)

(A CRITICAL STUDY OF GOAN MARATHI SHORT STORIES POST 1990 – A study Based on the stories of selected authors)

# अनुक्रमणिका


प्रस्तावना

प्रास्ताविक ........................................ **Error! Bookmark not defined.**

संशोधनाची उद्दिष्टे ........................................ **Error! Bookmark not defined.**

संशोधन विषयाचे क्षेत्र आणि उपयुक्तता ........................................ **Error! Bookmark not defined.**

संशोधन पद्धती ........................................ **Error! Bookmark not defined.**

1. ऐतिहासिक अभ्यास पद्धती ........................................ **Error! Bookmark not defined.**

2. वर्णनात्मक पद्धती ........................................ **Error! Bookmark not defined.**

3. तौलनिक अभ्यास पद्धती ........................................ **Error! Bookmark not defined.**

गृहीतके ........................................ **Error! Bookmark not defined.**

प्रबंधाची मांडणी ........................................ **Error! Bookmark not defined.**

समारोप ........................................ **Error! Bookmark not defined.**

प्रकरण १

कथा: संकल्पना, स्वरूप व व्याप्ती

1.1 प्रस्तावना ........................................ **Error! Bookmark not defined.**

1.2 लघुकथेचे स्वरूप व तंत्र– व्याख्या ........................................ **Error! Bookmark not defined.**

1.3 कथेचे घटक ........................................ **Error! Bookmark not defined.**

1.3.1 घटना ........................................ **Error! Bookmark not defined.**

1.3.2 कथानक ........................................ **Error! Bookmark not defined.**

1.3.3 पात्र ........................................ **Error! Bookmark not defined.**

1.3.4 निवेदक ........................................ **Error! Bookmark not defined.**

1.3.5 संवाद ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

1.3.6 भाषा ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

1.4 कथा व कल्पित वास्तव ........................................................ **Error! Bookmark not defined.**

1.5 मराठी कथेचे स्वरूप ........................................................ **Error! Bookmark not defined.**

1.5.1 करमणूकपूर्व कालखंड - कथेच्या पूर्वतयारीचे युग ............... **Error! Bookmark not defined.**

1.5.2 करमणूक कालखंड ........................................................ **Error! Bookmark not defined.**

1.5.3 मनोरंजन कालखंड ........................................................ **Error! Bookmark not defined.**

1.5.4 यशवंत – किर्लोस्कर कालखंड (१९२६ ते १९४५) ............. **Error! Bookmark not defined.**

1.5.5 मराठी नवकथेची सुरूवात (१९४५ ते १९६०).................... **Error! Bookmark not defined.**

1.5.6 साठोत्तरी मराठी कथा ........................................................ **Error! Bookmark not defined.**

1.5.7 १९७५ नंतरचा कथेचा स्थित्यंतराचा कालखंड व आजच्या नव्वदोत्तरी मराठी कथेची वाटचाल. ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

1.6 समारोप ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

संदर्भ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

प्रकरण २

१९९० पूर्व गोमंतकीय मराठी कथा

2.1 प्रास्ताविक ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

2.2 गोमंतकीय मराठी कथेची सुरूवात व मुक्तिपूर्व गोमंतकीय मराठी कथा .........**Error! Bookmark not defined.**

2.2.1 प्रारंभ ते १९४५ पर्यंतची गोमंतकीय मराठी कथा ................. **Error! Bookmark not defined.**

2.2.2 १९४५ – १९६१ या कालखंडातली गोमंतकीय मराठी कथा ... **Error! Bookmark not defined.**

2.3 १९६१ नंतरची मुक्तीनंतरच्या कालखंडातली गोमंतकीय मराठी कथा ..........**Error! Bookmark not defined.**

2.4 समारोप ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

संदर्भ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ३

# नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा


3.1 प्रास्ताविक ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

3.1.1 – गोमंतकातील सामाजिक पार्श्वभूमी व नव्वदोत्तरी गोव्यातील सामाजिक स्थित्यंतरे............. **Error! Bookmark not defined.**

3.1.2 – नव्वदोत्तरी गोमंतकीय सांस्कृतिक जीवन ......................... **Error! Bookmark not defined.**

3.1.3 – नव्वदोत्तरी गोव्यातील राजकीय परिस्थिती व निगडीत प्रश्न... **Error! Bookmark not defined.**

3.2 नव्वदोत्तरी कालखंडातील गोमंतकीय लेखकांचे कथा लेखन...... **Error! Bookmark not defined.**

3.2.1 विठ्ठल ठाकूर यांचे कथालेखन ......................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.1.1 मनोविश्लेषणात्मक व मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करणाऱ्या कथा. **Error! Bookmark not defined.**

3.2.1.2 स्त्री जीवनातील दु:खाचे चित्रण ............................. **Error! Bookmark not defined.**

3.2.1.3 मानवी भावविश्वाचे चित्रण करत कथांमध्ये आलेल्या जगण्याच्या शोकांतिका ........... **Error! Bookmark not defined.**

3.2.1.4 व्यक्त झालेले जीवनविषयक तत्त्वज्ञान...................... **Error! Bookmark not defined.**

3.2.1.5 गोवा मुक्तीनंतर स्वातंत्र्यसैनिकांचे जीवन चित्रण ......... **Error! Bookmark not defined.**

3.2.2. पु. शि. नार्वेकर यांचे कथालेखन...................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.2.1 गोवा मुक्तिपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीवर मुक्तीनंतरच्या कालखंडातील सामाजिक बदलांचे चित्रण ......................................................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.2.2 गोवा मुक्तिपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीवर पोर्तुगीजांच्या राजसत्तेतील अन्याय अत्याचारांचे चित्रण ......................................................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.2.3 गोवा मुक्तिचळवळीचे चित्रण ................................ **Error! Bookmark not defined.**

3.2.2.4 मानवी वृत्तीप्रवृत्तींचे चित्रण .................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.2.5 गोवा मुक्तिनंतरच्या कालखंडातील स्वातंत्र्यसैनिकांच्या व्यथांचे चित्रण. **Error! Bookmark not defined.**

3.2.2.6 असफल प्रेमाकथा.............................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.2.7 किस्स्यात्मक निवेदन करणाऱ्या कथा...................... **Error! Bookmark not defined.**

3.2.2.8 मिथकातून स्त्रीजीवानावर भाष्य............................. **Error! Bookmark not defined.**

3.2.3 गजानन रायकर यांचे कथालेखन ...................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.3.1 पोर्तुगीज सत्तेच्या पार्श्वभूमीवर, गोवा स्वातंत्र्यसंग्राम व जनतेवरील अन्याय अत्याचाराचे चित्रण ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

3.2.3.2 जातीव्यवस्था व कुळवाड्यांच्या प्रश्नांचे चित्रण.......... **Error! Bookmark not defined.**

3.2.3.3 गोमंतकीय समाजजीवनातील बदलांचे चित्रण ........... **Error! Bookmark not defined.**

3.2.3.4 गोवा मुक्तिसंग्रामाच्या पार्श्वभूमीचे चित्रण.................. **Error! Bookmark not defined.**

3.2.3.5 मनोविश्लेषणात्मक कथा ...................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.3.6 व्यक्तिकेंद्रीततेतून भिन्न प्रवृत्तींचे चित्रण.................... **Error! Bookmark not defined.**

3.2.3.7 उत्कट प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या कथा ................... **Error! Bookmark not defined.**

3.2.4 विठ्ठल गांवस यांचे कथालेखन......................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.4.1 ख्रिस्ती समाजजीवनाचा वेध घेणाऱ्या कथा.............. **Error! Bookmark not defined.**

3.2.4.2 समाज वास्तवाचा वेध घेणाऱ्या कथा ...................... **Error! Bookmark not defined.**

3.2.4.3 मानवी मनोवृत्तींवर भाष्य करणाऱ्या कथा ................ **Error! Bookmark not defined.**

3.2.4.4 सुशिक्षिताच्या मानसिक कोंडीचे चित्रण.................. **Error! Bookmark not defined.**

3.2.4.5 प्रेमभावनेचे चित्रण.............................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.4.6. भ्रष्टाचार व राजकारणाचे चित्रण ........................... **Error! Bookmark not defined.**

3.2.4.7 गोमंतकातील सामाजिक समस्यांचे चित्रण............... **Error! Bookmark not defined.**

3.2.4.8 स्त्री जीवन व स्त्री समस्यांचे चित्रण .......................... **Error! Bookmark not defined.**

3.2.5 नारायण महाले यांचे कथा लेखन...................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.5.1 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण.................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.5.2 गोमंतकीय समकालीन प्रश्नांचे चित्रण ...................... **Error! Bookmark not defined.**

3.2.5.3 गोमंतकीय समाजजीवनातील बदलांचे चित्रण ........... **Error! Bookmark not defined.**

3.2.5.4 स्त्री जीवनाच्या व्यथा .......................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.6 मिलिंद म्हामल यांचे कथा लेखन .................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.6.1 भाऊबंदकीचे चित्रण ........................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.6.2 आधुनिक जगण्यात निर्माण झालेल्या गोमंतकातील बदलांचे चित्रण .... **Error! Bookmark not defined.**

3.2.6.3 स्त्री जीवनाचे चित्रण............................................ **Error! Bookmark not defined.**

3.2.6.4 शहरी जीवनात झालेली माणसांची ओढताण ............ **Error! Bookmark not defined.**

3.2.6.5 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण.................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.6.6 पर्यावरणीय प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या कथा ................ **Error! Bookmark not defined.**

3.2.6.7 गोव्यातील बदलांचे ग्रामसंस्कृतीवर उमटलेले पडसाद . **Error! Bookmark not defined.**

3.2.7 चंद्रकांत गावस यांचे कथालेखन ...................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.7.1 शारीरिक वासना व  मानवी जीवनमूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण........ **Error! Bookmark not defined.**

3.2.7.2 प्रेम भावना व उदात्त प्रेमाचे चित्रण .......................... **Error! Bookmark not defined.**

3.2.8 ज्ञानेश्वर कोलवेकर यांचे कथालेखन ................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.8.1 स्त्री दु: ख, भावनाविवशता व स्त्री स्वभावाच्या भिन्न पैलूंचे चित्रण. **Error! Bookmark not defined.**

3.2.8.2 गोमंतकीय सोनार समाजाचा व्यावसायिक संघर्ष मांडणाऱ्या कथा . **Error! Bookmark not defined.**

3.2.8.3 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण ................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.8.4 सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न ....... **Error! Bookmark not defined.**

3.2.8.5 गोव्यात असलेल्या परप्रांतीयांचा प्रश्न ...................... **Error! Bookmark not defined.**

3.2.9 सु. म. तडकोड यांचे कथालेखन....................................... **Error! Bookmark not defined.**

3.2.10 उदय नाईक यांचे कथालेखन ........................................ **Error! Bookmark not defined.**

3.2.10.1 सामाजिक स्पंदने टिपत मानवतावादी दृष्टीकोनाची उपेक्षा व्यक्त करणाऱ्या समाजात बळावलेल्या प्रवृत्तींचे चित्रण करणाऱ्या कथा ........................ **Error! Bookmark not defined.**

3.2.10.2 बोधप्रधान स्वरूपाच्या कथा .............................. **Error! Bookmark not defined.**

3.2.10.3 समकालीन सामाजिक प्रश्नांवर, समाज वास्तवावर भाष्य ........... **Error! Bookmark not defined.**

3.2.11 दयाराम पाडलोस्कर यांचे कथा लेखन ............................ **Error! Bookmark not defined.**

3.2.11.1 स्त्री जीवनाच्या शोकांतिका................................ **Error! Bookmark not defined.**

3.2.11.2 व्यक्तींच्या दुःखद कहाण्या ................................. **Error! Bookmark not defined.**

3.2.11.3 प्रेमभावनेचे चित्रण............................................ **Error! Bookmark not defined.**

3.2.11.4 मूल्यऱ्हासाचे चित्रण ........................................ **Error! Bookmark not defined.**

3.2.11.5 मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण ............................... **Error! Bookmark not defined.**

3.2.11.6 सर्वसामन्यांच्या जगण्याचे चित्रण ......................... **Error! Bookmark not defined.**

3.2.11.7 ग्रामीण समाजजीवनातील ‘बावळा’ची क्षणचित्रे ...... **Error! Bookmark not defined.**

3.2.12 गजानन देसाई यांचे कथालेखन ...................................... Error! Bookmark not defined.
3.2.12.1 ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण........................... Error! Bookmark not defined.
3.2.12.2 भाटकरशाहीतील अनैतिकतेचे चित्रण ................... Error! Bookmark not defined.
3.2.12.3 मानवी वृत्तींचे चित्रण......................................... Error! Bookmark not defined.
3.2.12.4 सर्वसामान्य माणसांच्या जगण्याचे चित्रण .............. Error! Bookmark not defined.
3.2.12.5 समाजातील रूढी पद्धतींवर भाष्य ......................... Error! Bookmark not defined.
3.2.12.6 स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण ................................ Error! Bookmark not defined.
3.2.12.7 जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारी कथा ........................ Error! Bookmark not defined.
3.3 नव्वदोत्तरी कालखंडातील स्त्रियांचे कथा लेखन....................... Error! Bookmark not defined.
3.3.1 वासंती नाडकर्णी यांची अनुभवसंपन्न कथा......................... Error! Bookmark not defined.
3.3.2. माधवी देसाई यांचे कथा लेखन....................................... Error! Bookmark not defined.
3.3.2.1. स्त्रियांच्या भावविश्वाचे चित्रण.............................. Error! Bookmark not defined.
3.3.2.2. स्त्रीवादी स्वरूपाचे कथा लेखन ............................. Error! Bookmark not defined.
3.3.2.3. माणसांच्या हतबलतेच्या कहाण्या ......................... Error! Bookmark not defined.
3.3.3. ज्योती कुंकळकर यांची स्त्री जीवनातील स्पंदने टिपणारी कथा. Error! Bookmark not defined.
3.3.4 मेघना कुरुंदवाडकर यांचे कथालेखन ................................ Error! Bookmark not defined.
3.3.4.1 स्त्री जीवनाच्या शोकांतिका.................................. Error! Bookmark not defined.
3.3.4.2 स्त्री स्वभावाच्या भिन्न छाटा ................................ Error! Bookmark not defined.
3.3.4.3 स्त्रियांचे भावविश्व ............................................... Error! Bookmark not defined.
3.3.5 आरती दिनकर यांचे कथा लेखन...................................... Error! Bookmark not defined.
3.3.5.1 आधुनिक स्त्री जीवनावर भाष्य.............................. Error! Bookmark not defined.
3.3.5.2 तटस्थ स्त्री भूमिका............................................. Error! Bookmark not defined.
3.3.5.3 स्त्री जीवनातील प्रश्नांवर भाष्य.............................. Error! Bookmark not defined.
3.3.5.4 विशुद्ध विनोदी कथा ........................................... Error! Bookmark not defined.
3.3.6 अंजली आमोणकर यांचे कथा लेखन ............................... Error! Bookmark not defined.
3.3.6.1 नातेसंबंधांवर भाष्य............................................. Error! Bookmark not defined.
3.3.6.2 स्त्री जीवनाचे चित्रण............................................ Error! Bookmark not defined.
3.3.6.3 रहस्यात्मक स्वरूपाच्या कथा ............................... Error! Bookmark not defined.

3.3.7 हेमा नायक यांचे स्त्री जाणिवा व्यक्त करणारे व स्त्रीवादी स्वरूपाचे कथा लेखन.. **Error! Bookmark not defined.**

3.3.8 प्रतिभा कारंजकर यांच्या कथेतील अनुभव विश्व.................. **Error! Bookmark not defined.**

3.3.8.1 आधुनिक नातेसंबंधांवर भाष्य .............................. **Error! Bookmark not defined.**

3.3.8.2 स्त्रियांचे भावविश्व ............................................... **Error! Bookmark not defined.**

3.3.9 रेखा पौडवाल यांचे कथालेखन....................................... **Error! Bookmark not defined.**

3.3.9.1 स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचे चित्रण............ **Error! Bookmark not defined.**

3.3.9.2 स्त्रियांच्या भावविश्वाचे चित्रण............................... **Error! Bookmark not defined.**

3.3.9.3 स्त्री स्वभावाच्या भिन्न छटांचे चित्रण...................... **Error! Bookmark not defined.**

3.3.9.4 स्त्री पुरुष नातेसंबंधातील गुंते ................................ **Error! Bookmark not defined.**

3.3.9.5 मानवी जगण्यातील शोकांतिका व मानवी वृत्ती प्रवृत्तीवर भाष्य..... **Error! Bookmark not defined.**

3.3.9.6 व्यवहारीक जगण्यात मानवी संवेदनशीलतेवर भाष्य.... **Error! Bookmark not defined.**

3.3.10 सुजाता सिंगबाळ यांची स्त्री पुरुषांच्या स्नेहविश्वाचे भावबंध टिपणारी कथा .... **Error! Bookmark not defined.**

3.3.11 गिरिजा मुरगोडी यांच्या स्त्री जीवनावर भाष्य करणाऱ्या कथा . **Error! Bookmark not defined.**

3.4 समारोप ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

संदर्भ...................................................................................... **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ४

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीणता व प्रादेशिकता

4.1 प्रास्ताविक .................................................................. **Error! Bookmark not defined.**

4.2 ग्रामीणता व प्रादेशिकता: संकल्पना ................................... **Error! Bookmark not defined.**

4.2.1 ग्रामीण साहित्य व प्रादेशिक साहित्य: फरक – भेद............... **Error! Bookmark not defined.**

4.3 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील ग्रामीण जीवनाचे चित्रण ........... **Error! Bookmark not defined.**

4.3.1 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील कृषी संस्कृतीचे व निगडीत प्रश्नांचे चित्रण **Error! Bookmark not defined.**

4.3.2 ग्रामीण समाजव्यवस्था व ग्रामीण वास्तवाचे चित्रण ....... **Error! Bookmark not defined.**

4.3.3 ग्रामीण समजुती व ग्रामजीवनातील लोकांच्या मानसिकतेचे चित्रण... **Error! Bookmark not defined.**

4.3.4 ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण............................... **Error! Bookmark not defined.**

4.3.5 ग्रामीण स्त्रीजीवनाचे चित्रण..................................... **Error! Bookmark not defined.**

4.4 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतून आविष्कृत होणारी प्रादेशिकता .... **Error! Bookmark not defined.**

4.5 समारोप ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

संदर्भ.................................................................................. **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ५

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण

5.1 प्रस्तावना ..................................................................... **Error! Bookmark not defined.**

5.1.1 जागतिक राजकारण, १९९० नंतरची भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरे आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया .................................................................... **Error! Bookmark not defined.**

5.1.2 ग्राम, नगर, नागर संस्कृतीतून महानगरीकरणाच्या प्रक्रियेत खा-उ-जा संस्कृतीची भूमिका ........ **Error! Bookmark not defined.**

5.2 नव्वदोत्तरी गोमंतक व खा-उ-जा संस्कृती ............................. **Error! Bookmark not defined.**

5.3 खा-उ-जा संस्कृती व साहित्य सहसंबंध ............................... **Error! Bookmark not defined.**

5.4 निवडलेल्या नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकारांच्या कथेतून दिसून येणारे खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद ............................................................................... **Error! Bookmark not defined.**

5.4.1 जागतिकीकरणामुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या गोमंतकाचे चित्रण .... **Error! Bookmark not defined.**

5.4.2 खाण व्यवसायामुळे झालेल्या गोव्यातील बदलांचे चित्रण ...... **Error! Bookmark not defined.**

5.4.3 पर्यटन व्यवसायामुळे निर्माण झालेल्या गोव्यातील प्रश्नांचे चित्रण............ **Error! Bookmark not defined.**

5.4.4 कॅसिनो संस्कृतीचे गोव्यातील समाजजीवनावर उमटलेले पडसाद ........... **Error! Bookmark not defined.**

5.4.5 जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या चंगळवादी संस्कृतीचे चित्रण .........**Error! Bookmark not defined.**

5.4.6 सांस्कृतिक एकजिनसीकरणामुळे, पाश्चात्य संस्कृतीकडे ओढल्या जाणाऱ्या नवीन पिढी व जुन्या पिढीमधील संघर्षाचे चित्रण .................................................... **Error! Bookmark not defined.**

5.4.7 परदेशात कामानिमित्त गेलेल्या व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा भाग बनलेल्या गोवेकरांच्या व्यथा .......................................................................... **Error! Bookmark not defined.**

5.4.8 उदारीकरण व खाजगीकरणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण............**Error! Bookmark not defined.**

5.5 समारोप ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

संदर्भ........................................................................... **Error! Bookmark not defined.**

प्रकरण 6

## मध्यवर्ती मराठी कथेचा गोमंतकीय कथेवर असलेला प्रभाव

6.1 प्रस्तावना ..................................................................... **Error! Bookmark not defined.**

6.2 विषयकेंदीय प्रभाव आणि सहसंबंध .................................... **Error! Bookmark not defined.**

6.3 मध्यवर्ती मराठी कथासाहित्याच्या तुलनेत समकालीन गोमंतकीय कथेच्या मर्यादा.**Error! Bookmark not defined.**

6.4 मध्यवर्ती व गोमंतकीय नव्वदोत्तरी स्त्री कथालेखन: प्रभाव व भेद. **Error! Bookmark not defined.**

6.5 तंत्रनिष्ठ प्रभाव आणि भेद ................................................ **Error! Bookmark not defined.**

6.6 गोमंतकीय मराठी कथेची वैशिष्ट्ये बलस्थाने: मध्यवर्ती कथेच्या तुलनेत.......**Error! Bookmark not defined.**

6.7 समारोप ........................................................................ **Error! Bookmark not defined.**

संदर्भ........................................................................... **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ७

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन

7.1 प्रास्ताविक .................................................................... **Error! Bookmark not defined.**

7.2 कथानकाची मांडणी व अवलंबिलेले कथातंत्र ........................ **Error! Bookmark not defined.**

7.2.1 शैली विशेष................................................................ **Error! Bookmark not defined.**

7.3 नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील व्यक्तिचित्रणे................. **Error! Bookmark not defined.**

7.4 नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत कथाकारांनी अवलंबिलेली निवेदनपद्धती**Error! Bookmark not defined.**

7.5 नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील वातावरण विषयक वैशिष्ट्ये ............**Error! Bookmark not defined.**

7.6 नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेची भाषाशैली व संवाद रचना .. **Error! Bookmark not defined.**

7.7 नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील म्हणी, वाक्प्रचारांचा वापर.............**Error! Bookmark not defined.**

7.8 समारोप ......................................................................... **Error! Bookmark not defined.**

संदर्भ.................................................................................. **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ८

## उपसंहार आणि निष्कर्ष

8.1 प्रास्ताविक ................................................................... **Error! Bookmark not defined.**

प्रकरण १ : कथा: संकल्पना, स्वरूप, व्याप्ती................................ **Error! Bookmark not defined.**

प्रकरण २ : १९९० पूर्व गोमंतकीय मराठी कथा............................ **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ३ : नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा............................. **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ४ : नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीणता व प्रादेशिकता......**Error! Bookmark not defined.**

प्रकरण ५ : नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण **Error! Bookmark not defined.**

प्रकरण ६ : मध्यवर्ती मराठी कथेचा गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव....**Error! Bookmark not defined.**

प्रकरण ७ : नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन.. **Error! Bookmark not defined.**

8.2 निष्कर्ष ......................................................................... **Error! Bookmark not defined.**

# परिशिष्ट

परिशिष्ट ............ **Error! Bookmark not defined.**

परिशिष्ट १ : गोव्याचा राजकीय नकाशा. ............ **Error! Bookmark not defined.**

परिशिष्ट २: उत्तर गोव्याचा नकाशा ............ **Error! Bookmark not defined.**

परिशिष्ट ३ : दक्षिण गोव्याचा नकाशा ............ **Error! Bookmark not defined.**

परिशिष्ट ४ : गोव्याचा पर्यटन नकाशा. ............ **Error! Bookmark not defined.**

परिशिष्ट ५ : प्रातिनिधिक स्वरुपात निवडलेल्या भिन्न लेखकांच्या साहित्यकृतींची मुखपृष्टे ............ **Error! Bookmark not defined.**

परिशिष्ट ६ : अभ्यासासाठी निवडलेल्या कथाकारांचा परिचय ............ **Error! Bookmark not defined.**

पु. शि. नार्वेकर ............ **Error! Bookmark not defined.**

ज्ञानेश्वर कोलवेकर ............ **Error! Bookmark not defined.**

विठ्ठल गावस ............ **Error! Bookmark not defined.**

नारायण महाले ............ **Error! Bookmark not defined.**

सु. म. तडकोड ............ **Error! Bookmark not defined.**

दयाराम पाडलोस्कर ............ **Error! Bookmark not defined.**

गजानन यशवंत देसाई ............ **Error! Bookmark not defined.**

उदय जनार्दन नाईक ............ **Error! Bookmark not defined.**

मेघना गजानन कुरुंदवाडकर ............ **Error! Bookmark not defined.**

सौ. प्रतिभा कारंजकर ............ **Error! Bookmark not defined.**

सौ. गिरिजा मुरगोडी ............ **Error! Bookmark not defined.**

अंजली आमोणकर ............ **Error! Bookmark not defined.**

माधवी देसाई ............ **Error! Bookmark not defined.**

डॉ. आरती दिनकर ............ **Error! Bookmark not defined.**

रेखा पौडवाल ............ **Error! Bookmark not defined.**

ज्योती अवधूत कुंकळकर ............ **Error! Bookmark not defined.**

सौ. रेखा श्रीनिवास मिरजकर ............ **Error! Bookmark not defined.**

# संदर्भसूची

संदर्भसूची............................................................................**Error! Bookmark not defined.**

अ) ग्रंथसूची ............................................................................................................ 50

आ) प्रबंध ................................................................................................................ 57

इ) स्मरणिका, नियतकालिकें, संशोधन पत्रिका................................................................ 57

ई) संकेतस्थळे ........................................................................................................... 60

उ) आधारग्रंथ सूची ................................................................................................... 60

***

# प्रकरण १

## कथा: संकल्पना, स्वरूप व व्याप्ती

कथा हा साहित्याचा मूलभूत आणि प्राचीन प्रकार आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत कथा हा समाजाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि भावनिक जडणघडणीचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. मौखिक परंपरेतून लेखी स्वरूपात विकसित होत असताना कथेच्या रचनेत आणि आशयामध्ये सातत्याने बदल होत गेले. कथा ही केवळ मनोरंजनासाठी नसून, ती सामाजिक वास्तव, तत्त्वज्ञान, मानसिकता आणि मानवी नातेसंबंध यांचे प्रभावी प्रतिबिंब आहे. गोष्टी, लोककथा, पुराणकथा, जातककथा आणि पंचतंत्र या प्राचीन कथा साहित्याच्या विविध रूपांतून पुढे विकसित होत गेल्या आणि आधुनिक लघुकथेच्या रूपात प्रकट झाल्या. या प्रकरणात कथा या साहित्य प्रकाराचा उगम, तिचे स्वरूप, घटक, प्रकार, व्याप्ती आणि मराठी साहित्याच्या प्रवाहातील तिचे स्थान यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

कथा म्हणजे संक्षिप्त, कलात्मकरीत्या मांडलेली घटना किंवा विचारांची मांडणी. मौखिक स्वरूपात कथन करणाऱ्या प्रवृत्तीपासून लिखित स्वरूपात निवेदनात्मक पद्धतीचा व कथानात्मकतेचा आधार घेत कथा या वाङ्मयप्रकारचा जन्म झाला. कथन करण्याच्या मानवी सहजप्रवृत्तीपासून कहाणीचा जन्म ते आधुनिक कथेचे रूप म्हणून लघुकथेपर्यंतचा कथेचा प्रवास सांगता येतो. कथेची पृथगात्मकता समजून घेत कथेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या कथामीमांसकांनी भिन्न व्याख्यांच्या आधारे केलेला आहे. या व्याख्यांवरून, कथन करण्याच्या सहज प्रवृत्तीपासून, कहाणी, गोष्ट ते आजच्या लघुकथेपर्यंत आकार घेणारे, लघुत्व किंवा स्फुट रूप हे लघुकथेचे स्वतंत्र असे गद्य स्वरूप नोंदविले दिसून येते. लघुकथेच्या दुय्यमत्वाचा नकार करत, कथा व कादंबरीच्या तुलनेत लघुकथेचा सुटसुटीतपणा, लघुकथेचे स्फुट स्वरूप, कमी पात्रे व मोजक्याच प्रसंगातून अल्पावकाशात, सुसंघटीतपणे, परिणामकारकपणे वाचकांच्या मनावर पडसाद उमटवणारी लघुकथा असे एकूण लघुकथेचे स्वरूप स्पष्ट केले जाते. तसेच कमी आवाक्यातून दीर्घत्वाकडे झुकणाऱ्या कथेच्या रूपावर विवेचन करत लघुकथा व दीर्घकथा या दोहोंमधील वेगळेपणा महत्त्वाचा ठरतो. कथेच्या स्वरूप लक्षणांचा वर्णनात्मक परामर्श घेताना कथेचे वेगवेगळे घटक महत्त्वाचे ठरतात. आजच्या लघुकथेच्या परिवेशात वावरणारे घटक म्हणजेच घटना, कथानक, पात्र, वातावरण, निवेदन, संवाद, भाषा यांच्या एकजिनसीकरणातून कथा एकात्म

परिमाण साधत असते. कथेत घटना, पात्रे आणि स्थळकालबद्ध वातावरण यातून कल्पित वास्तव आकार घेत असते. कथेतून येणारे कल्पित वास्तव कथेच्या अनुभवविश्वाला आकार देण्यास महत्त्वाचे ठरते.

कथेला लाभलेली प्राचीन परंपरा स्पष्ट करताना आदिम स्थितीत सांगितलेल्या जादू टोणे, भुतेखेते, यक्षकिन्नर आदींच्या कथा, भारतीय वेदपुराणातील कथा, मिथककथा, दैवतकथा, व्रतकथा, कहाण्या, मौखिक परंपरेनुसार सांगितल्या जाणाऱ्या लोककथा आणि दंतकथा, इसापनीती – पंचतंत्रातल्या कथा, चातुर्यकथा, शिशुकथा, अद्भुतरम्य कथा इत्यादी प्रकारातून निर्माण झालेली कथन करण्याच्या पद्धती दिसून येतात. मौखिक परंपरेतील कथा ग्रंथनिर्विष्ठ झाली. इंग्रजांमुळे मुद्रणकला आली आणि मराठी गद्य साहित्याला निराळे वळण लाभले, करमणूकपूर्व कालखंड, करमणूक कालखंड, मनोरंजन कालखंड, यशवंत - किर्लोस्कर कालखंड, मराठी नवकथेच्या सुरूवातीचा कालखंड, साठोत्तरी मराठी कथेत निर्माण झालेले भिन्न प्रवाह, १९७५ नंतरचा कथेचा स्थित्यंतराचा कालखंड व आजच्या नव्वदोत्तरी मराठी कथेची वाटचाल अशा एकूण प्रवासात आशय व रचनातंत्राच्या दृष्टीने निर्माण झालेल्या प्रयोगशीलतेच्या अनुषंगाने मराठी कथेचे बदलते स्वरूप उलगडत गेले.

मौखिक स्वरूपातील या परंपरेने आधुनिक कथेचा पाया घातल्याने एका विशिष्ट ढाच्यात कथा आकार घेऊ लागली. पण कथेच्या सुधारित रूपाचे स्वरूप खूप जुने सांगता येत नाही. एडगर एलेन पो, गोगोल अशा काही कथालेखकांनी या साहित्यप्रकाराचे कालातंत्र घडवले असे म्हणत आधुनिक साहित्यसंस्कृतीत कथेने स्थान निर्माण केले असे म्हणता येईल. कथा लिखित स्वरुपात आल्यानंतर कथेला कलात्मक घाट देण्याचा प्रयत्नही झाला. रूपकात्मकता, अद्भुताची योजना, फॅंटसी, मिथचे तत्त्व, निवेदनाचा विशिष्ट घाट इत्यादी तंत्रांचा कथेने नाविन्यपूर्ण पद्धतीने वापर केल्याचे दिसून येते. कथेचे तंत्र विकसित होते त्याचबरोबर कालानुरूप कथा लेखनाच्या प्रयोजनामध्ये बदल घडत गेल्याचे दिसून येतात. काळाबरोबर कथेच्या आशय विषयांची वृद्धी होताना आपल्याला दिसून येते.

## प्रकरण २

# १९९० पूर्वीची गोमंतकीय मराठी कथा

हे प्रकरण गोमंतकीय मराठी कथांच्या उदय आणि विकासाचा आढावा घेते. १९९० नंतरच्या गोमंतकीय मराठी कथेचा अभ्यास करताना, १९९० पूर्वीच्या कथांची परंपरा आणि त्यांचे स्वरूप समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्रकरणात कथा वाङ्मयाच्या ऐतिहासिक प्रवासाची मांडणी करण्यात आली आहे.

गोमंतकीय मराठी कथेचा प्रवास मध्ययुगीन मराठी साहित्याच्या पार्श्वभूमीवर पाहायला मिळतो. लोककथा, पुराणकथा, व्रतकथा यासारख्या कथारूपांचा प्रभाव गोमंतकीय मराठी कथांवर दिसतो. गोमंतकीय मराठी कथांचा अभ्यास २००३ मध्ये गोमंतक मराठी अकादमीने प्रकाशित केलेल्या "गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास" या ग्रंथातून झाला.

गोमंतकीय कथेचा विचार करत असताना आपल्याला अगदी मौखिक परंपरेतल्या लोककथांचा उल्लेख करावा लागतो. गोमंतकाला लोककथेची मौखिक परंपरा लाभली आहे. गोवामुक्तीपूर्व आणि मुक्तीनंतरच्या काळातही गोमंतकीय कथेमध्ये विपुल प्रमाणात भर पडलेली आहे. या कथेतून व्यक्त होणारी प्रदेशनिष्ठा, लोकसंस्कृती, गोमंतकीय समाज व त्यांच्या समस्या यांचे विपुल प्रमाणात दर्शन घडताना दिसते. वैशिष्ट्यपूर्ण अशी गोमंतकीय मराठी कथा मध्यवर्ती मराठी कथेहून विविधांगाने वेगळी ठरते. कथेतून येणारे विषय गोमंत प्रदेशनिष्ठा व्यक्त कारताना दिसतात तसेच गोमंत लोकसंस्कृतीची पार्श्वभूमी या कथांना लाभलेली दिसते. "नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ही समकालीन मराठी कथेला समांतर अशी आहे"[1] असे मत प्रा. विनय बापट यांनी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा या आपल्या शोधनिबंधातून मांडलेले आहे. गोमंतकीय मराठी कथेचे समीक्षक डॉ. बाळकृष्ण कानोळकर यांनी पाच टप्पे मांडलेले आहेत. १) मध्ययुगीन मराठी कथा, २) १९१० ते १९२५, ३) १९२६ ते १९३०, ४) १९३० ते १९४५, ५) १९४६ ते १९६१, पुढील काळाचे १९६२ ते १९७५, १९७६ ते १९९० आणि १९९० व त्यानंतर असे टप्पे मांडले गेले आहेत.

कथेच्या आरंभापासून मध्यवर्ती मराठी कथेच्या समांतर जाणाऱ्या गोमंतकीय मराठी कथेचे टप्पे, गोमंतकीय कथा अभ्यासक डॉ. बाळकृष्णजी कानोळकर यांनी स्पष्ट केलेले आहे. पहिल्या टप्प्यात गोमंतकीय कथेच्या मौखिक परंपरेचा विचार करावा लागतो. लोककथांची समृद्ध अशी परंपरा गोमंतकाला लाभलेली आहे.

कृष्णदास शामा लिखित ‘श्रीकृष्णचरित्रकथा’ हा गोमंतकीय आद्य मराठी ग्रंथ ठरतो. आख्यानकाव्याच्या स्वरूपात लिहिलेला हा ग्रंथ पद्य जरी असला तरी कथनात्म पद्धतीने लिहिलेले हे पद्य असल्याने कथेचे ते एक आद्य रूप म्हणावे लागते. विष्णुदास नामा या नावावर ‘प्रल्हादचरित्र’, ‘हरिशचंद-पुराणकथा’ व ‘सुखद(दे)व चरित्रकथा’ असे तीन कथासंग्रह असल्याची नोंद दिसते. तसेच ‘गरुडाची कथा’, ‘हरणीची कथा’, ‘मृग राजाची कथा’ अशा अनामिक कवींच्या रचनाही असल्याचे दिसून येते. कथा वाङ्मयाचा प्रारंभबिंदू हा कृष्णदास शामा विरचित श्रीकृष्णचरित्राच्याही आधीचा काळ आहे असे म्हटले जाते. १९३० पर्यंतच्या गोमंतकीय मराठी कथा नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली दिसून येते. ‘लोकमित्र’ सारखे नियतकालिक मोठ्या प्रमाणात गोमंतकात वितरीत होत होते ज्यातून अनेक कथा प्रसिद्ध झाल्या. या नियतकालिकांमुळे गोमंतकीय मराठी कथा लेखकांची जडणघडणही झाली. या कालखंडातील लिहिणारे आत्माराम वामन भांडारी, भास्कर गोविंद रामाणी, शंकर बळवंत उर्फ गंगाराम, ग. कृ. शिरसाट, यशवंत सूर्यराव सरदेसाई उर्फ भाई देसाई तसेच स्त्री कथाकारांमध्ये हिराबाई पेडणेकर सारख्या स्त्री लेखिका मुंबईत राहून कथा लेखन करत होत्या पण स्त्री कथालेखनाचे संग्रह या काळात प्रसिद्ध झाले नाहीत. नियतकालिकांमधून स्त्रियांचे कथालेखन प्रकाशित होत होते. यात हिराबाई पेडणेकर, यमुनाबाई बोरकर, भद्राबाई माडगावकर, शांताबाई कामत, लक्ष्मीबाई कामत, यमुना बोरकर, ‘विनयवती’ या टोपण नावाने लिहिणाऱ्या लेखिकेचा समावेश होतो. त्यांनी आपल्या लेखनातून स्त्रियांच्या जीवनातील संघर्ष, सामाजिक अन्याय, कुटुंबव्यवस्थेतील बंधने आणि स्वातंत्र्याची आस या विषयांवर प्रकाश टाकला. त्यांच्या कथांमध्ये बोधकथात्मकता आणि अनुभवाधारित सशक्त अभिव्यक्ती आढळते.या कालखंडावर असलेल्या तत्कालीन करमणूक-मनोरंजन कालखंडातील कथेचा प्रभाव अभ्यासकांनी स्पष्ट केलेला दिसून येतो.

या कालखंडातील अनुवादित स्वरूपाच्या कथालेखनही महत्त्वाचे ठरते. गोमंतकीय मराठी साहित्याच्या घडणीमध्ये भाषांतरित साहित्याचा मोठा वाटा आहे. पोर्तुगीज राजवटीच्या काळात गोव्यावर पोर्तुगीज भाषेचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे गोमंतकीय मराठी साहित्यात पोर्तुगीज, इंग्रजी, फ्रेंच तसेच हिंदी आणि कोंकणी भाषांमधून आलेल्या साहित्यिक प्रभावांचे प्रतिबिंब दिसते.

1. नवीन विषय आणि शैलींचा समावेश: भाषांतरित साहित्यामुळे गोमंतकीय मराठी लेखकांना युरोपीय आणि भारतीय अन्य भाषांतील साहित्यिक प्रवाहांची ओळख झाली. त्यामुळे कथा लेखनात नवीन विषय, अभिव्यक्ती शैली, आणि तंत्रांचा समावेश झाला.

2. पोर्तुगीज साहित्याचा प्रभाव: गोव्यात दीर्घकाळ पोर्तुगीज शासन असल्यामुळे तेथील साहित्य, सांस्कृतिक जाणिवा आणि जीवनशैली गोमंतकीय मराठी कथांमध्ये प्रकट झाल्या. पोर्तुगीज कथा आणि कादंबऱ्यांचे मराठीत अनुवाद झाले आणि त्याने स्थानिक लेखकांना प्रेरणा दिली.
3. कथनशैलीतील प्रयोग: अनुवादित साहित्यामुळे गोमंतकीय मराठी लेखकांनी कथनशैलीत विविध प्रयोग केले. विशेषतः संरचित कथा, पत्रात्मक शैली आणि मनोविश्लेषणात्मक कथा लेखनाचे प्रयोग भाषांतरित साहित्याच्या प्रभावामुळे झाले.

गोमंतकीय मुक्तीपूर्व कथेचा विचार करत असताना सां. घ. कंटक हे महत्त्वाचे लेखक ठरतात तसेच वि. स. सुखटणकरांनी मराठी कथाविश्वाला बहाल केलेली प्रादेशिकता वैशिष्ट्यपूर्ण ठरते. १९३० ते १९४५ या गोमंतकीय मराठी कथेच्या सुवर्णकाळात प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई व जयवंतराव सरदेसाई या लेखकांनी कथालेखनाला सुरूवात केलेली दिसून येत. व्यंकटेश अनंत पै रायकर, का. दा. घोडे, प्र. शां. मांजरेकर, ना. के. शिरोडकर, ह. वि. देसाई, वि. द. साळगावकर, भवानी शंकर वागळे, दत्तात्रय विष्णू कीर्तने या लेखकांबरोबर स्नेहलता वैद्य यांचे लेखन, लक्ष्मणराव सरदेसाईंचे कथेत असलेले वैशिष्ट्यपूर्ण स्थान लक्षात येते. १९४५ ते १९६० हा मराठी साहित्यविश्वात स्थित्यंतराचा काळ मानला जातो. मराठी साहित्यविश्व समृद्ध होत असताना गोमंतकीय कथाक्षेत्राला लाभलेली गळती जाणवते. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई, पं. महादेवशास्त्री जोशी यांनी मुंबई, पुण्यात राहून लेखनकार्य सुरू ठेवलेले दिसते तसेच नवोदित लेखकांच्या कथालेखनाबरोबर ही कथा मध्यवर्ती मराठी कथेला समांतर जाणारी ठरते.

गोमंतक १९६१ सालात पोर्तुगीजांच्या तावडीतून मुक्त झाला. इथल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनांमध्ये अनेक स्थित्यंतरे निर्माण झाली. प्रा. नारायण महाले यांनी गोमंतकीय कथालेखकांच्या तीन पिढ्या मांडलेल्या आहेत. त्यात पहिल्या पिढीतील लेखकांमध्ये वि. स. सुखटणकर, प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई, बा. भ. बोरकर, पं. महादेवशास्त्री जोशी, सां. घ. कंटक, जयवंतराव सरदेसाई, मनोहर हिरबा सरदेसाई, गणाधीश खांडेपारकर, का. पुं. घोडे, व्यंकटेश अनंत पै रायकर, बा. द. सातोस्कर इत्यादींचा विचार केलेला आहे. या लेखकांनी गोवा मुक्तिपूर्व काळात लेखन केले आहे तसेच मुक्तीनंतरच्या कालखंडातही त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे. गोवा मुक्तीनंतरच्या काळात दुसऱ्या पिढीमध्ये नोकरी व्यवसायामुळे गोव्यात स्थायिक झालेल्या लेखकांनीही लेखन केलेले आहे. त्यात डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. नरेश कवडी, यशवंत कर्णिक, डॉ. अरुण हेबळेकर,

प्रा. मुरलीधर कुलकर्णी, प्रा. सुरेश वाळिंबे हे लेखक महत्त्वाचे ठरतात. तिसऱ्या पिढीमध्ये जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, वासंती नाडकर्णी, डॉ. विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर इत्यादी लेखकांचा विचार करावा लागतो. तिसऱ्या पिढीतील हे लेखक १९९० नंतरच्या कालखंडाचे प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे लेखक आहेत. १९९० नंतरच्या कालखंडातही त्यांचे लेखन सातत्याने सुरू असलेले दिसून येते.

मराठी साहित्यात त्याच्या प्रारंभापासून आजपर्यंत अनेक स्थित्यंतरे झालेली दिसून येतात. साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक नवीन प्रवाह उदयास आल्याचे दिसून येते, स्वाभाविकच त्याचे पडसाद गोमंतकीय मराठी साहित्यावरही उमटले. गोमंतकातही  प्रादेशिकता, ग्रामीणता असे आधुनिक जीवनप्रवाहातील संदर्भ साहित्यातून दृगोच्चर होत होते. भौगोलिकत: गोमंतक जरी महाराष्ट्राला जवळचाच प्रदेश असला तरीहि या छोट्याशा प्रदेशाला विविधतेने संमृद्ध अशी सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय तसेच ऐतिहासिक परिमाणे लाभलेली आहेत. गोमंतकात असलेल्या पोर्तुगीज राजवटीमुळे गोमंतकीय साहित्याची मुक्तीपूर्व व मुक्तीनंतरचे साहित्य अशी विभागणी सुयोग्य आणि सप्रमाण ठरते. गोमंतकात 'कथा' या साहित्यप्रकारच्या प्रवासाचा विचार करत असता १९६१ नंतर गोमंतकीय मराठी कथेच्या प्रवासाच्या टप्प्यात गोवा मुक्तीनंतरच्या गोव्यातील बदलांचे पडसाद उमटतात व त्याच्या पुढे जाऊन १९९० नंतर गोमंतकात झपाट्याने बदललेल्या ग्रामजीवनातील, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनातील बदलते स्वरूप व १९९० नंतरच्या टप्प्यातील आधुनिक गोमंतकातील प्रश्न व समस्यांचे, इथल्या ग्रामीण सांस्कृतिक लोकजीवनाचे दर्शन या कथांमधून होताना दिसते.

हे प्रकरण गोमंतकीय मराठी कथांच्या ऐतिहासिक प्रवासाचा सखोल अभ्यास करते. गोमंतकीय कथा विविध टप्प्यांतून विकसित होत गेली असून, त्या काळाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीशी निगडीत होती. तसेच, अनुवादित साहित्यामुळे गोमंतकीय मराठी कथेमध्ये अभिव्यक्तीचे नवे पैलू रुजले. १९९० नंतरच्या कथांचे मूलभूत स्वरूप समजून घेण्यासाठी १९९० पूर्वीच्या गोमंतकीय कथांचा अभ्यास अपरिहार्य ठरतो.

# प्रकरण ३

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा

हे प्रकरण १९९० नंतरच्या गोमंतकीय मराठी कथांच्या स्वरूपाचा सखोल अभ्यास करते. नव्वदोत्तरी कथा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय बदलांच्या पार्श्वभूमीवर घडताना दिसून येत. १९९० नंतरचा काळ हा गोव्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीत मोठ्या बदलांचा साक्षीदार ठरला. जागतिकीकरण, औद्योगिकीकरण आणि पर्यटक व्यवसायाच्या वाढीमुळे गोव्याच्या स्थानिक संस्कृतीवर प्रभाव पडला. स्थानिक जनतेच्या पारंपरिक जीवनशैलीवर नव्या आर्थिक धोरणांचा परिणाम झाला आणि त्यामुळे साहित्यिक अभिव्यक्तीही बदलली. यासोबतच गोमंतकीय मराठी कथेने परंपरेच्या चौकटीतून बाहेर पडत नव्या सामाजिक समस्यांकडे लक्ष वेधले. विशेषतः शहरीकरणामुळे बदलत गेलेली पारंपरिक मूल्ये, स्थलांतरितांचे जीवन आणि जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्न हे साहित्याच्या केंद्रस्थानी आले.

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा अनेक बदलांना स्वीकारून आकार घेताना दिसते. प्रत्येक कालखंडातील बदलांचे पडसाद समाज, संस्कृती, राजकारण, नातेसंबंध अशा भिन्न पातळीवर मानवी जीवनाला आकार देत असतात. नव्वदोत्तरी कालखंड हा प्रचंड उलथापालथींचा कालखंड आहे. गोमंतकीय कथेत समाजातील व लोकजीवनातील उलथापालथी, गोमंतकीय माणसाचे प्रश्न, इथली संस्कृती, राजकीय स्थित्यंतरे इत्यादींचे चित्रण झाले आहे. जीवनानुभवांचा स्वीकार करत नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा आकार घेत आहे. गोमंतकीय मराठी कथा मूळ प्रवाहाला समांतर जाणारी कथा मानली जाते. गोमंतक हा भारतापासून पोर्तुगीज काळापासून अलिप्त राहिलेला प्रदेश असल्याकारणाने या प्रदेशातील सामाजिक स्थित्यंतरांचा ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या अनुषंगाने विचार करणे महत्त्वाचे ठरते. 1961 हे गोवा मुक्तीचे वर्ष आहे. 1990 नंतरची गोमंतकीय साहित्यपरंपरा या बदलांना स्वीकारत आकार घेत असल्याचे दिसते. जागतिकीकरणामुळे गोमंतकीय समाजजीवनात झपाट्याने बदल होत आहेत. गोवा हे पर्यटनक्षेत्र म्हणून विकसित झाले आहे. पर्यटनाच्या विकासाबरोबर अनेक गोष्टी तेजीने चालताना दिसतात. विकासाच्या नावावर गोव्यातील पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून जन आंदोलने झाली. गोमंतकातील भाषिक वाद संपुष्टात आणण्याच्या प्रयत्नात कोंकणीला राजभाषा व मराठीला सहभाषेचा मान दिला गेला. नव्वदोत्तरी कालखंडात गोव्यात भाषिक प्रश्न एक नवा आयाम

स्वीकारून पुढे येऊ लागला. जागतिकीकरणामुळे इंग्रजीला महत्त्व दिले गेले. परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे गोव्यात पोटापाण्यासाठी येऊ लागले. त्यामुळे गोमंतकात गुन्ह्यांचा आकडाही वाढला. गोमंतकीय प्रदेशात अनेक स्थित्यंतरे निर्माण झाली. आधुनिक जगण्याशी समरस झालेल्या शहरी गोव्यातील लोकांना नवतेचे हादरे पोहोचत आहेत, तर दुसरीकडे ग्रामीण भागांमध्ये लोकजीवनाचे, सांस्कृतिक जीवनाचे जतन होताना दिसते. गोवा हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने अत्यंत छोटे राज्य आहे, 40 विधानसभा मतदारसंघ व दोनच लोकसभा मतदारसंघ असलेल्या गोव्यातील राजकारण मात्र अत्यंत किचकट आहे. कालखंडात कथा हा साहित्यप्रकार गोमंतकात बहरलेला दिसतो. या कालखंडात लेखन करणारे लेखकांनी 1990 नंतरच्या कालखंडात जीवनातील बदलांना स्वीकारून लेखन केले.

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत गोमंतकातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनाचे पडसाद उमटलेले दिसून येतात. १९९० नंतरची कथा विचारात घेत असताना कथा लेखन करणाऱ्या तिसऱ्या पिढीचा विचार केलेला आहे. १९९० पूर्व लेखन करणारे व १९८० ते १९९० या दशकात गोमंतकीय कथेचे दालन समृद्ध करणाऱ्या तिसऱ्या पिढीतील कथाकारांमध्ये जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, वासंती नाडकर्णी, विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर इ. कथाकारांचा उल्लेख करावा लागतो. १९९० नंतरच्या पूर्वार्धात पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर, वासंती नाडकर्णी, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल ठाकूर हे लेखक लेखन करताना दिसून येतात. गोवा मुक्तिपूर्व पार्श्वभूमी, गोमंतकीय स्वातंत्र्य संग्रामाचे चित्रण तसेच मुक्तीनंतर गोव्यात झालेल्या स्थित्यंतराचा वेध या कथाकारांनी आपल्या कथांमधून घेतलेला आहे. १९९० नंतरच्या उत्तरार्धात म्हणजेच २००० ते २०२० दरम्यान लेखन करणाऱ्या चौथ्या पिढीतील लेखकांमध्ये विठ्ठल गांवस, नारायण महाले, मिलिंद म्हामल, चंद्रकांत गावस, सु. म. तडकोड, उदय नाईक, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई यांच्या कथालेखनात बदलते जीवन, प्रदेशनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न व बदलत्या ग्रामाजीवनात शिरकावलेल्या आधुनिक संस्कृतीचे पडसाद दिसून येतात तसेच या कथा खा-उ-जा संस्कृतीचा वेध घेणाऱ्या ठरतात. विठ्ठल गावस यांच्या कथेमधून आलेला ख्रिस्ती समाज, मानवी वृत्ती प्रवृत्ती, सुशिक्षितांच्या मानसिक कोंडीचे चित्रण, प्रेम भावना, भ्रष्टाचार, राजकारण, गोमंतकातील सामाजिक समस्या, ग्रामजीवनातील स्त्री समस्या, बदलत्या आधुनिक जीवन पद्धती इत्यादी विषयांवर भाष्य करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मिलिंद म्हामल यांच्या कथेतून शहरीकरणाच्या प्रक्रियेत बदलणाऱ्या गोमंतकातील समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. चंद्रकांत गावस यांच्या कथेत वासना व मानवी जीवन मूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण दिसून येते. ज्ञानेश्वर कोलवेकर यांच्या कथेत स्त्री दुःख, भावनाविवशता, स्त्री स्वभावाचे भिन्न

पैलू उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कथा गोमंतकीय सोनार समाजातील व्यवसायिक संघर्ष मांडताना दिसून येतात. एकूण सर्वसामान्यांचे प्रश्न ,गोव्यात आलेल्या परप्रांतीयांचे प्रश्न, गोव्यातील बदलांचे चित्र इत्यादी विषयांची मांडणी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून झालेली दिसून येते. सु. म. तडकोड यांच्या अस्तित्ववादी विचारसरणीला अनुसरून आलेल्या कथा या कालखंडातील गोमंतकीय कथालेखनात वेगळ्या ठरतात. उदय नाईक यांच्या सामाजिक स्पंदने टिपत मानवतावादी दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या कथा, समाजात बळावलेल्या भिन्न प्रवृत्तींचे चित्रण करणाऱ्या कथा, बोध प्रधान स्वरूपाच्या कथा, तसेच काणकोण तालुक्यातील प्रदेशनिष्ठा व्यक्त करत ग्रामजीवनाचा वेध घेणाऱ्या ठरतात. दयाराम पाडलोस्कर यांच्या कथेत आलेल्या प्रेमातील शोकांतिका, मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण करणाऱ्या कथा, स्त्री जीवनाचे मांडलेले विदारक असे चित्रण, शेतकरी, कुळवाड्यांच्या व्यथा, मानवी मूल्यव्यवस्थेला हादरे देण्याचा प्रयत्न, बदलत्या गोमंत जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न दिसून येतो. गजानन देसाई या बदलत्या जीवनाला सामोरे जाणाऱ्या लेखकाचे कथाविश्व, चालीरीतीतील फोलपणा उलगडण्याच्या प्रयत्नात असलेले दिसून येतो. नव्वदोत्तरी कालखंडातील अत्यंत महत्त्वाच्या स्त्री लेखिका म्हणून माधवी देसाई यांच्या कथेमधून दिसून येणाऱ्या स्त्री जाणिवा तसेच त्यांच्या कथेतील स्त्रीवादी दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो. १९९० नंतर लिहिणाऱ्या गोमंतकीय स्त्री लेखिकांमध्ये रेखा पौडवाल, गिरीजा मुरगोडी, मेघना कुरुंदवाडकर, अंजली आमोणकर, आरती दिनकर, रेखा मिरजकर, सुजाता सिंगबाळ, वासंती नाडकर्णी या कथा लेखिकांच्या कथेमधून येणाऱ्या स्त्री जीवनाचा, मध्यमवर्गीय कौटुंबिक स्त्री जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. एका विशिष्ट अनुभवविश्वापूर्ती मर्यादित न राहता अनुभवाची विविधांगी रूपे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून चित्रित झालेली दिसून येतात.

नव्वदोत्तरी गोमंतकीय स्त्री कथा लेखिकांचे विश्व स्त्री जीवनापुरते मर्यादित राहिलेले दिसून येते. अपवाद वगळल्यास १९९० पूर्व लेखन करणाऱ्या व १९९० नंतरच्या कालखंडात अविरत पणे कथा लेखन करणाऱ्या वासंती नाडकर्णी यांचे अनुभवसंपन्न विश्व कथेतून दिसून येते. स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण करणाऱ्या माधवी देसाईंच्या काही कथांमधून माणसांच्या हतबलतेच्या कहाण्या आलेल्या दिसून येतात. आरती दिनकर यांनी विशुद्ध विनोदी स्वरुपात कथा लिहित नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखनातून आशय विषयदृष्ट्या नाविन्यपूर्णता आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्याचप्रमाणे अंजली अमोणकर यांच्या काही रहस्यात्मक कथा आलेल्या दिसून येतात. त्याचप्रमाणे रेखा पौडवाल यांच्या काही कथांमधून मानवी जगण्यातील शोकांतिका मांडत, मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य केलेले दिसून येते. व्यावहारिक जगण्यात हरवलेल्या संवेदनशीलतेबद्दल त्यांची कथा भाष्य

करते. नव्वदोत्तरी कथेतील हा वेगळेपणा सोडल्यास बहुतांशी कथा या स्त्रीचे भावविश्व चितारताना, स्त्री जीवनाच्या शोकांतिका, स्त्री स्वभावाच्या भिन्न छटा, आधुनिक स्त्री जीवन, स्त्रीचे प्रश्न, स्त्रीमधील तटस्थपणा, आधुनिक नातेसंबंध, अशा स्त्री जीवनाशी निगडीत भिन्न आयमांना मांडण्याच्या प्रयत्नात गोमंतकीय नव्वदोत्तरी स्त्री कथा एकलकोंडे होत गेल्याचे दिसून येते.. स्त्री जीवन व स्त्री जाणिवांशी समरस होणाऱ्या गोमंतकीय नव्वदोत्तरी स्त्री लेखिका बंडखोर होत स्त्रीवादी बनताना दिसत नाहीत. अपवाद वागळल्यास माधवी देसाई व हेमा नाईक यांच्या कथांमध्ये स्त्री वादाची छटा आपल्याला दिसून येते. त्याचप्रमाणे नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखक ज्या ताकदीने ग्रामीण स्त्री जीवन व ग्रामीण स्त्रीच्या व्यथांशी समरस झालेला आहे त्या ताकदीने नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखिका झालेल्या दिसून येत नाहीत. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखिका या प्रामुख्याने शिक्षित, मध्यमवर्गीय असल्याने तसेच गोव्याबाहेरून येत बरीच वर्षे गोव्यात वास्तव्यास असल्यामुळे गोमंतकीय ग्रामीण जीवन हे तिच्या अनुभवकक्षेच्या पलीकडचे असल्याने स्त्री कथाकारांच्या लेखनाला मर्यादा आलेली दिसून येते.

१९९० नंतरच्या गोमंतकीय मराठी कथा लेखन परंपरेत, १९९० पूर्व लेखन करणारे व १९८० ते १९९०, २००० या दशकांत गोमंतकीय कथेचे दालन समृद्ध करणाऱ्या तिसऱ्या पिढीतील कथाकारांमध्ये जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, वासंती नाडकर्णी, विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर इ. कथाकारांचा उल्लेख करावा लागतो. १९९० नंतरच्या पूर्वार्धात पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर, वासंती नाडकर्णी, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल ठाकूर हे लेखक लेखन करताना दिसून येतात. १९९० च्या पूर्वार्धात लिहिलेल्या, प्रामुख्याने विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर यांच्या कथा पूर्वसुरींची मनोविश्लेषणात्मक कथा, गोवा मुक्तिपूर्व काळातील चळवळी, तसेच मुक्तीनंतरच्या गोमंत जीवनातील स्थित्यंतरांना सामोरे जाताना दिसते. १९९० नंतरच्या उत्तरार्धात म्हणजेच २००० ते २०२० दरम्यान लेखन करणाऱ्या चौथ्या पिढीतील लेखकांमध्ये विठ्ठल गांवस, नारायण महाले, मिलिंद म्हामल, चंद्रकांत गावस, सु. म. तडकोड, उदय नाईक, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई या लेखकांनी लिहिलेल्या दिसून येतात. नव्वदोत्तरी कालखंडाच्या उत्तरार्धातील गोमंतकीय कथेची पार्श्वभूमी शहरी असो वा ग्रामीण, गोमंतकाच्या वेगवेगळ्या स्तरावर झालेले बदल हा या कथेचा स्थायीभाव ठरतो. लेखकांपरत्वे पार्श्वभूमी, कथानक यामध्ये बदल जाणवतो. काही कथा शहरीकरणाच्या प्रक्रियेतील गोमंतकाचे वातावरण चित्रित करतात, काही अस्सल ग्रामीण गोवा, रुढी, परंपरा, समाजजीवन व एकूण प्रदेशनिष्ठा व्यक्त करणाऱ्या ठरतात. ही कथा गोमंतकातील प्रश्नांचा वेध घेते. गोमंतकातील ग्रामजीवनातील चालीरीतींच्या आधारे ग्रामजीवन चित्रण करते,

भिन्न मानवी वृत्ती प्रवृत्तींवर भाष्य करत स्त्री जीवनाच्या व्यथा मांडते, प्रदेशनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न व बदलत्या ग्रामाजीवनात शिरकाव झालेल्या आधुनिक जीवनाचा तसेच खा-उ-जा संस्कृतीचा वेध घेणाऱ्या ठरतात. नव्वदोत्तरी कथेचा विचार करत असताना कथा लेखन करणारी तरुणांच्या फळीतून निर्माण होणारी पाचवी पिढी गोमंतकीय कथेतून लेखन करताना दिसत नसल्याने आजचे आधुनिक जीवन, विज्ञान तंत्रज्ञानातील बदलांचे पडसाद जे समाजमानसावर, लोकजीवनावर उमटलेले आहेत त्याचे पडसाद लेखनातून उमटताना दिसत नाही. नव्वदोत्तरी मूळ कथेच्या प्रवाहात लेखन करणाऱ्या तरुण लेखक पिढीच्या समांतर गोमंतकीय कथा जाताना दिसत नसल्याने ही या काळातील कथालेखनाची मर्यादा म्हणावी लागते

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ही सामाजिक परिवर्तन, स्त्रीजीवन आणि मानवी भावनांच्या गुंतागुंतीचे प्रतिबिंब आहे. साहित्यिकांनी गोव्याच्या स्थानिक आणि जागतिकीकरणामुळे झालेल्या बदलांचा वेध घेत नवी संवेदनशील अभिव्यक्ती निर्माण केली आहे. त्यामुळे गोमंतकीय मराठी कथांचा हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

# प्रकरण ४

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीणता व प्रादेशिकता

गोमंतकीय मराठी कथा ही केवळ कथा म्हणून महत्त्वाची नाही, तर ती एका विशेष भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्राचे प्रतिबिंब आहे. ग्रामीणता आणि प्रादेशिकता या संकल्पनांमधील गुंता उलगडून पाहिल्यास मराठी कथालेखनाच्या परिघामध्ये या दोन्ही घटकांचे महत्त्व स्पष्ट होते. डॉ. आनंद यादव यांच्या मते, ग्रामीणता ही प्रादेशिकतेच्या अंतर्गत येणारी व्यापक संकल्पना आहे. ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याच्या संकल्पनांचा एकत्रित अभ्यास करताना, त्यांचे विशेष गुणधर्म आणि साम्यस्थळे यांचा शोध घेणे आवश्यक ठरते.

ग्रामीण जीवनाच्या चित्रणातून साहित्य आकार घेत असते. ग्रामीण जीवन ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून त्यामध्ये विशिष्ट जीवनशैली, चालीरीती, सामाजिक संबंध, शेतीप्रधान अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक घडामोडी यांचा समावेश असतो. गोमंतकीय मराठी कथांमधून ग्रामीण समाजातील परिवर्तन, शेती संस्कृती, लोकसमजुती आणि स्त्रियांचे जीवन यांचे अत्यंत सूक्ष्म व वास्तवदर्शी चित्रण आढळते. ग्रामीणता आणि प्रादेशिकता या दोन संकल्पना परस्परपूरक असल्या तरीही त्यामध्ये काही मूलभूत फरक आहेत. ग्रामीण साहित्य हे विशेषतः खेड्यातील जीवनाचा वेध घेते. हे साहित्य गावकऱ्यांच्या रोजच्या जीवनातील संघर्ष, शेतीप्रधान अर्थव्यवस्था, जातीय व्यवस्था, पारंपरिक समजुती आणि बदलत्या जीवनशैलीचा अभ्यास करते. डॉ. नारायण कोत्तापल्ले यांच्या मतानुसार, ग्रामीणता ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून ती संपूर्ण जीवनशैलीवर आधारित असते. ग्रामीणता ही श्रमप्रधान जीवनसंस्कृतीशी निगडित असून, तिचा अभ्यास करताना समाजातील कृतिप्रधानता, नैसर्गिक वातावरणाशी असलेले संबंध आणि परंपरांचे अनुकरण यांना महत्त्व दिले जाते.

प्रादेशिकता ही एक विस्तृत साहित्य संकल्पना आहे. ती केवळ ग्रामीण मर्यादेपुरती सीमित न राहता, विशिष्ट प्रदेशाच्या भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकते. एका विशिष्ट प्रदेशातील भाषा, परंपरा, सण-उत्सव, राजकीय आणि सामाजिक घडामोडी यांचा प्रादेशिकतेशी थेट संबंध असतो. प्रादेशिक साहित्य हे त्या त्या प्रदेशाच्या बोलीभाषेचा उपयोग करून वाचकांना त्या ठिकाणाच्या वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यास सक्षम असते. ग्रामीणता आणि प्रादेशिकता या दोन्ही संकल्पनांमध्ये एक महत्त्वाचा दुवा आहे,

तो म्हणजे सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब. ग्रामीण साहित्य हे विशेषतः कृषीप्रधान संस्कृतीवर लक्ष केंद्रित करत असते, तर प्रादेशिक साहित्य हे त्या प्रदेशाच्या सर्वांगीण जीवनशैलीचे दर्शन घडवते. नव्वदोत्तरी कालखंडातील गोमंतकीय लेखकांनी आपल्या कथांमधून गोव्याच्या ग्रामीण भागातील शेती, शेतकऱ्यांचे जीवन, शेतीमधील समस्या आणि पारंपरिक शेती पद्धतींचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण केले आहे. ग्रामीण समाजव्यवस्था ही जातिव्यवस्था, वर्गसंघर्ष, स्थानिक सत्तासंबंध आणि सामाजिक नियमांच्या बंधनांवर आधारित असते. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथांमधून ही सामाजिक व्यवस्था उलगडताना, त्यातील ताणतणाव याचा स्पष्ट वेध घेतलेला दिसतो.

ग्रामीण जीवनाची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे लोकसमजुती आणि परंपरा. गावातील समाजजीवन अनेक अंधश्रद्धा, धार्मिक समजुती, सण-उत्सव आणि सामाजिक संकेतांवर आधारित असते. गोमंतकीय कथांमध्ये गावकऱ्यांच्या श्रद्धा, परंपरा आणि त्यांच्या जीवनावर होणारा प्रभाव यांचे प्रभावी चित्रण केले आहे. समकालीन ग्रामीण जीवन हे झपाट्याने बदलत आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानामुळे ग्रामजीवनावर होणारा परिणाम हा गोमंतकीय कथांमध्ये प्रकर्षाने जाणवतो. गावातील तरुणवर्ग शिक्षण, नोकरी आणि चांगल्या संधींसाठी शहरांकडे स्थलांतर करतो, त्यामुळे पारंपरिक ग्रामीण जीवनशैलीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत आहे. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा या बदलत्या ग्रामीण जीवनाचा अभ्यास करून, परंपरा आणि आधुनिकतेच्या संघर्षावर भाष्य करतात. गोमंतकीय कथांमध्ये ग्रामीण स्त्रीच्या कष्टमय जीवनाचे तसेच स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचे चित्रण केलेले दिसून येते. प्रादेशिक साहित्य हे त्या प्रदेशाच्या जीवनशैलीचे जिवंत चित्रण करते. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथांमध्ये स्थानिक बोलीभाषेचा वापर, संस्कृतीचे प्रतिबिंब, सण-उत्सवांचे चित्रण आणि स्थानिक राजकीय-सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण आढळते.

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील महत्त्वाचे कथाकार विठ्ठल गांवस यांनी ग्रामीण वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याचप्रमाणे गजानन रायकर व अन्य कथाकारांच्या कथांमध्ये कुळ मुंडकारांच्या व्यथांतून ग्रामीण वास्तवाचे चित्रण झालेले दिसून येते. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेमधून कृषी संस्कृती चित्रण झालेले दिसते. याअंतर्गत शेती करण्याच्या गोमंतकातील भिन्न पद्धती, कृषी जीवनाची पार्श्वभूमी लाभलेले कथा इत्यादींवर विवेचन केलेले आहे. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकारांनी ग्रामीण स्त्री जीवनाच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. गोमंतकीय नव्वदोत्तरी कथेतून प्रादेशिक स्वरूपाचे प्रश्न आलेले दिसून येतात त्याचबरोबर

गोमंतकातील रुढी, संस्कृती, परंपरा, समजूती यांचे चित्रण होताना दिसून येते. गोमंतकीय कथाकार उदय नाईक, मिलिंद म्हामल, नारायण महाले अशा काही कथाकारांच्या कथेमधून वैशिष्ट्यपूर्ण अशी गोमंतकीय प्रादेशिकता व्यक्त होताना दिसून येते.

या प्रकरणात गोमंतकीय मराठी कथांमधील ग्रामीणता आणि प्रादेशिकता यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. शेतीप्रधान संस्कृती, बदलत्या ग्रामीण जीवनशैली, जातीय व सामाजिक व्यवस्थेतील संघर्ष आणि आधुनिकतेच्या प्रभावाखाली बदलणारे गावजीवन हे या कथांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. गोमंतकीय साहित्याची काही वैशिष्ट्ये येथील आधुनिक साहित्याला शंभर वर्षे होता होता नोंदवता येणे शक्य आहेत. त्यापैकी पहिले वैशिष्ट्य म्हणजे येथील कथा वाङ्मय हे लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या काळात प्रादेशिकतेच्या निकषावर पुढे येत गेले. १९७० ते १९८० च्या दरम्यान झालेल्या कथालेखनात प्रादेशिकतेचे निकष धूसर होऊन त्यावर ग्रामीण वाङ्मयाचा साज चढू लागला. आज बहुतांशी गोमंतकीय कथा ही ग्रामीण आणि प्रादेशिक कथेची मधली म्हणावी अशी अवस्था आहे. काही ठिकाणी तिचे पारडे ग्रामीणतेकडे झुकते तर क्वचित ठिकाणी ती प्रादेशिक वळणाचेही समर्थन करते. परंतु संशोधक म्हणून यासंदर्भात गोमंतकीय कथेच्या शंभरीच्या उंबरठ्यावर तिला प्रादेशिक किंवा ग्रामीण ही संबोधने न देता गोमंतकीय कथा हा संकल्पनिक संबोध सुयोग्य ठरतो.

## प्रकरण ५

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण

१९९० च्या दशकात भारताच्या अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल झाले. औद्योगीकरणालामुळे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खा-उ-जा) गती मिळाली आणि मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाले. पारंपरिक ग्रामीण जीवनशैलीवर परिणाम होऊन नागरी संस्कृती झपाट्याने विकसित झाली. त्याचा प्रभाव गोव्याच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनावरही पडला. या बदलांमुळे गोव्यात पारंपरिक शेती व्यवसायाच्या जागी पर्यटन, खाण व्यवसाय आणि कॅसिनो संस्कृती उदयास आली. पाश्चात्य जीवनशैलीचा प्रभाव वाढला आणि तरुणाई त्याकडे आकर्षित झाली. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते आणि त्यामुळे गोमंतकीय मराठी कथांमध्ये या बदलांचे स्पष्ट प्रतिबिंब उमटले. गोव्याच्या पारंपरिक ग्रामीण जीवनावर खा-उ-जा संस्कृतीचा खोलवर परिणाम झाला आहे. १९६१ मध्ये गोवा मुक्त झाला आणि १९९० नंतरच्या काळात सामाजिक आणि आर्थिक जीवनात मोठे बदल घडून आले. पर्यटनामुळे गोव्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळाली, परंतु त्याचबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. स्थानिक लोकसंस्कृती आणि पर्यावरण यांवर नकारात्मक परिणाम झाला. पूर्वीचा कृषिप्रधान गोवा आता मुख्यतः पर्यटनावर अवलंबून राहिला आहे. स्थानिक कला, संगीत आणि खाद्यसंस्कृतीदेखील पाश्चात्य प्रभावाखाली बदलत चालली आहे.

साहित्य समाजातील घडामोडींचे प्रतिबिंब असते. खा-उ-जा संस्कृतीमुळे मराठी साहित्याच्या आशयात परिवर्तन झाले. आधुनिक गोव्याच्या बदलत्या जीवनशैलीचे चित्रण तसेच पारंपरिक जीवनशैलीचा लोप, पर्यटनामुळे झालेली संस्कृतीची हानी, पाश्चात्य जीवनशैलीकडे वाढलेला ओढा आणि खाण व्यवसायामुळे उद्भवलेली पर्यावरणीय संकटे यांचे मार्मिक चित्रण गोमंतकीय मराठी कथेत आढळते. गोव्याच्या ग्रामीण भागाचा ऱ्हास, जागतिकीकरणामुळे पसरलेली चंगळवादी संस्कृती, कॅसिनो आणि पर्यटनामुळे वाढलेली गुन्हेगारी, पारंपरिक मूल्यांचे पतन आणि जागतिकीकरणामुळे मानसिक तणावाला सामोरे जाणाऱ्या गोवेकरांची स्थिती यांचे कथांमध्ये प्रभावी चित्रण दिसून येते.

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे पडसाद उमटलेले दिसून येतात. नव्वदोत्तरी कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरामुळे निर्माण झालेली खा-उ-जा

संस्कृती, ग्राम, नगर, नागर संस्कृतीतून महानगरीकरणाच्या प्रक्रियेला सामोरे जाणारी भारतातील अनेक राज्ये, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा भाग असलेला गोमंतक, खा-उ-जा संस्कृतीच्या प्रभावामुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या गोमंतकात झालेले बदल हे नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचे आशयविश्व निर्माण करताना दिसतात. विठ्ठल गांवसांच्या कथेमध्ये परंपरागत व्यवसायाला फाटे देत उभे होणारे कारखाने, मिलिंद म्हामल यांच्या कथेमधून दिसून येणारी पर्यटन संस्कृती, कॅसिनोमुळे झालेला मूल्यऱ्हास, दयाराम पाडलोस्कर यांच्या नव्या वाटा शोधू पाहणाऱ्या कथेतून आलेले पर्यटनामुळे निर्माण झालेले बदलांचे पडसाद. अशापद्धतीने नव्वदोत्तरी कथेतून बदलत्या आधुनिक गोमंतकावर उमटलेले खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद दिसून येतात.

जागतिकीकरणामुळे जग हे एक गाव बनेल ही संभावना व्यक्त केली जाते. पण भारताच्या एकूण भौगोलिक स्थितीमुळे भारताची सांस्कृतिक पृथगात्मकता टिकून राहिल्याचे दिसून येते. गोव्याची पृथक अशी सांस्कृतिक वैशिष्ट्ये अबाधित राहिल्याचे सत्यही जागतिकीकरणानंतरच्या तीन दशकात नाकारता येत नाही. गोमंतकीय मराठी कथेत गोमंतकीय प्रदेशात जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या ऱ्हासाचे चित्रण दिसत असले तरी कथेतील वातावरण व एकूण परिवेष हा गोवा प्रदेशाच्या भौगोलिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यानुसार आकार घेताना दिसून येतो. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद हे मागील दोन दशकात लिहिणाऱ्या, अभ्यासासाठी निवडलेल्या लेखकांपैकी ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, दयाराम पाडलोस्कर व गजानन देसाई या पाच लेखकांनी फुंकलेली तुतारी म्हणावी लागते. व्यापकपणे आधुनिक जगण्यातील खा-उ-जा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या स्थित्यंतरांना ही कथा सामोरी जाताना दिसत नाही. खा-उ-जा संस्कृतीशी निगडीत मर्यादित स्वरूपाचे आशयविश्व या कथाकारांच्या कथेतून व्यक्त होते. हे आशयविश्व पर्यटनव्यवसाय, कॅसिनो, खाण व्यवसाय, कंपन्या प्रस्थापित करण्यासाठी शेतजमिनीचे हस्तांतरण, जागेसाठी निर्माण झालेला भाऊबंदकीचा प्रश्न, परदेशी गेलेल्या ख्रिस्ती खलाशांच्या जीवनाची वाताहात, जुन्या नव्या पिढीमधील संघर्ष, चंगळवादी संस्कृती इत्यादी विषयांपुरते मर्यादित असलेले दिसून येते. मिलिंद म्हामल सोडले तर अन्य कथाकारांच्या एकूण कथालेखनाचा मुळात हेतूच खा-उ-जा संस्कृतीचे चित्रण करणे असेही म्हणणे अयोग्य ठरते. मिलिंद म्हामलांच्या कथेतील विश्व हे पर्यटननकेंद्री असल्याने खा-उ-जा संस्कृतीचे चित्रण करत असताना अनुभवविश्वातील तोचतोपणा लक्षात येतो. दयाराम पाडलोस्करांची कथा  ग्रामीण जीवन, स्त्री व्यथा, सामाजिक प्रश्न अशा भिन्न आयामांना स्पर्श करते. 'बावळ' हा त्यांचा प्रकाशित झालेला शेवटचा कथा संग्रह. या संग्रहातील शेवटच्या 'वाऽऽऽ कितें ?' व 'घुसमट' या दोन कथा आशयविश्वाच्या वेगळ्या वाटा चोखाळताना

दिसून येतात. नव्वदोत्तरी गोव्यातील वास्तवाला, बदलांना सामोरे जाणारे लेखक आपल्या कथा लेखनाच्या आशयविश्वाची दिशा बदलत्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनानुसार बदलत असल्याचे 'बावळ' या संग्रहाच्या शेवटी आलेल्या या दोन्ही कथांमधून सूचित करू पाहत असल्याचे दिसते व सुरूवातीच्या तीन दशकात नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेमध्ये खा-उ-जा संस्कृतीचे मर्यादित स्वरुपात व्यक्त झालेले अनुभवविश्व अधिक व्यापकतेने पुढील काळात निश्चितच बहरेल याची शाश्वती देतात.

## प्रकरण ६

## मध्यवर्ती मराठी कथेचा गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा व मध्यवर्ती मराठी कथा ही समांतर जाणारी आहे का? याचा या प्रकरणात अभ्यास केला आहे. साहित्य समाजाचे प्रतिबिंब असते. प्रत्येक साहित्यिक कालखंडात समाजातील बदल, आर्थिक परिस्थिती, सांस्कृतिक विचारसरणी आणि राजकीय घडामोडी यांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळेच, कोणत्याही प्रदेशाचे साहित्य हे त्या प्रदेशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पृष्ठभूमीशी घट्ट जोडलेले असते. १९९० नंतरच्या काळात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणामुळे भारतीय समाजात मोठे बदल झाले. ग्रामीण आणि नागरी जीवनशैलीत मोठी तफावत निर्माण झाली. आधुनिकीकरणामुळे माणसाच्या जगण्याच्या तत्त्वांमध्ये बदल झाले. हे सगळे बदल साहित्याच्या माध्यमातून स्पष्टपणे जाणवतात.

मध्यवर्ती मराठी कथा आणि गोमंतकीय मराठी कथा यांच्यातील विषयकेंद्रित प्रभाव पाहता, दोन्ही साहित्यात काही समान वैशिष्ट्ये आढळतात.

- मध्यवर्ती मराठी कथेप्रमाणेच गोमंतकीय कथांमध्येही ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण आढळते.
- जागतिकीकरणानंतर निर्माण झालेल्या आर्थिक अस्थिरतेचा प्रभाव दोन्ही साहित्यप्रवाहांवर दिसतो. चंगळवादी संस्कृती, औद्योगिकीकरणामुळे पारंपरिक व्यवसायांवर आलेले संकट हे मुद्दे कथांमधून प्रकर्षाने येतात.
- गोमंतकीय साहित्याने स्थानिक संस्कृती, धार्मिक परंपरा आणि लोकजीवनाचे चित्रण जसे केले आहे, तसेच मध्यवर्ती मराठी साहित्याने महाराष्ट्राच्या लोकजीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटवले आहे.

गोमंतकीय साहित्य स्वतःच्या परंपरेला जपत विकसित झाले असले, तरी मध्यवर्ती मराठी कथेशी तुलना करता त्यात काही मर्यादा दिसून येतात.

- मध्यवर्ती मराठी कथा ग्रामीण आणि नागरी जीवनातील संघर्षांची मोठ्या प्रमाणावर चर्चा करते. गोमंतकीय कथेच्या तुलनेत तिच्या व्याप्तीत अधिक विविधता दिसून येते. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा मुख्यतः स्थानिक प्रश्नांवर केंद्रित राहिलेली आहे.

- मध्यवर्ती साहित्याने कथनशैली, प्रायोगिक लेखन आणि समांतर प्रवाह यांमध्ये अनेक नवे प्रयोग केले, तर गोमंतकीय साहित्य हा प्रवाह तुलनेने पारंपरिक स्वरूपात अधिक राहिला आहे.

गोवा मुक्तीपूर्वकाळापासून गोमंतकीय कथा लेखन हे मध्यवर्ती मराठी कथेला समांतर चालत आल्याचे दिसून येते. त्यामुळे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा व मध्यवर्ती मराठी कथा ही समांतर जाणारी आहे का? हा विचार करणे गरजेचे ठरते. नव्वदोत्तरी कालखंडात विज्ञान तंत्रज्ञानात झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे माणसाच्या जीवनमानात प्रचंड प्रमाणात बदल झालेले आहेत. चंगळवादी संस्कृती फोफावलेली आहे. १९९० नंतर भारताने स्वीकारलेल्या आर्थिक धोरणामुळे निर्माण झालेली मुक्त अर्थव्यवस्था, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भारतात आगमन इत्यादी कारणांमुळे भारतीय माणसाला जगाची कवाडे उघडलेली आहेत व माणूस पाश्चात्य संस्कृतीशी आकर्षित होत आहे. ग्रामीण भागात सुधारणा होत असल्याने त्याचे साधक बाधक परिणाम ग्रामीण जीवनावर होत आहे. गावागावात निर्माण झालेली अशांतता, भाऊबंदकीचा प्रश्न, माणसामाणसांमध्ये निर्माण झालेला तुटलेपणा, ग्रामीण भागात भरडला जाणारा शेतकरी वर्ग, शेतकऱ्याचे कर्जबाजारी होणे व शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, पर्यावरणीय बदलांमुळे निर्माण होणारी दुष्काळग्रस्त स्थिती, वाढलेल्या दंगली, जातीयता, संवेदनहीनता, सत्तेचे राजकारण, भ्रष्टाचार, डिजीटल माध्यमांमुळे निर्माण झालेले प्रश्न, आभासीविश्व, नातेसंबधात निर्माण झालेली दरी, स्त्रियांचे जीवन असे अनेक प्रश्न या कालखंडात निर्माण झालेले दिसून येतात.

नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथेचा नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव स्पष्ट करत असताना मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथेमध्ये भर घालणारे महत्त्वाचे कथाकार रा. रं. बोराडे, रंगनाथ पठारे, मनोहर शहाणे, भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, श्रीराम गुंदेकर तसेच नव्या पिढीतील जगदीश कदम सारखे कथाकार, कृष्णा इंगोले इत्यादी. ग्रामीण विनोदी कथेचा विस्तार करणारे महत्त्वाचे लेखक रा. रं. बोराडे यांचा विचार करावा लागतो. त्यांच्या कथेत रंजनप्रधानता जरी असली तरी ग्रामीण वास्तवाला, ग्रामजीवनातील परिवर्तनाला भिडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथाकारांच्या कथांमध्ये दिसून येणाऱ्या ग्रामीण जीवनाचा वेध घेताना नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामजीवनातील अनुभवविश्वात भेद जाणवतो. त्याचबरोबर नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथा व नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा यांमध्ये प्रयोगशीलता, प्रतिकात्मकता, निवेदनातील प्रयोग अशा भिन्न तंत्रांमध्ये तफावत दिसून येते. पूर्वसूरींच्या गोमंतकीय कथाकारांचा नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव जाणवतो. मध्यवर्ती मराठी कथेत

ग्रामजीवनाबरोबर नागरी जीवन, महानगरीय जीवन, आधुनिक, सामाजिक जगण्यातील भिन्न प्रश्न, नातेसंबंधातील प्रश्न इत्यादी विषयांचा आढावा घेणाऱ्या जयंत पवार, सतीश तांबे, पंकज कुरुलकर, प्रशांत बागड, समर खडस, प्रणव सखदेव इत्यादी कथाकारांच्या लेखनात आलेल्या विषयांच्या तुलनेत गोमंतकीय मराठी कथेच्या मर्यादा लक्षात येतात. विज्ञान तंत्रज्ञान जगत व त्यामुळे निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांना वाचा देणारी पाचवी पिढी नव्वदोत्तरी गोमंतकीय कथालेखनात निर्माण होताना दिसत नाही. त्याचबरोबर मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथेतील महत्त्वाच्या लेखिका मनस्विनी लता रवींद्र, प्रज्ञा दया पवार, शिल्पा कांबळे, प्रतिमा इंगोले, मोनिका गजेंद्रगडकर, सुकन्या आगाशे, नीरजा अशा भिन्न स्त्री कथाकारांचा विचार करत गोमंतकीय स्त्री कथा लेखनामध्ये आलेले मर्यादित अनुभवविश्व, लेखिकांच्या कथालेखनातील ग्रामीण जीवनाचा अभाव इत्यादी गोष्टी दिसून येतात. मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथेत अत्यंत व्यापकतेने व्यक्त झालेले महानगरीय अनुभवविश्व हे नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेमधून व्यक्त होताना दिसत नाही. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील आशयविश्व हे प्रामुख्याने शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या गोमंतकातील बदलांना चित्रित करते. त्यामुळे ग्रामीण जीवन चित्रण किंवा खा-उ-जा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या बदलांचे चित्रण हा मध्यवर्ती मराठी कथा व गोमंतकीय मराठी कथा या दोहोंचा गाभा जरी असला तरी हे दोन्ही कथाविश्व नव्वदोत्तरी कालखंडात समांतर जाताना दिसत नाहीत. तसेच नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचे स्वतंत्र अस्तित्व समजून घेताना या कथेचे प्रदेशनिष्ठ अनुभवविश्व हे या कथेचे बलस्थान म्हणावे लागते.

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेवर उमटलेला मध्यवर्ती मराठी कथेचा प्रभाव विचारात घेत असताना लक्षात येते की साठोत्तरी साहित्यविश्वात निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्याचा प्रभाव गोमंतकीय कथेवरही उमटलेला आहे. ग्रामजीवनातील बदलांचे, ग्रामजीवनातील प्रश्नांचे चित्रण मध्यवर्ती नव्वदोत्तरी ग्रामीण कथेत होताना दिसते त्याचप्रमाणे गोमंत ग्रामजीवनातील प्रश्नांचे चित्रण येते. पण ग्रामीण जाणिवा, ग्रामीण प्रश्न, ग्रामीण संस्कृती यांमध्ये दोन्ही भागात भिन्नता असल्यामुळे अनुभवविश्वात फरक जाणवतो. ग्रामीण प्रवाह एक असला तरी भिन्न जाणिवा व ग्रामसंस्कृतीत झालेल्या बदलांचे चित्रण इत्यादी गोष्टी समांतर जाताना दिसत नाही. नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथेतून दिसून येणाऱ्या ग्रामजीवनातील वास्तवाचे व संघर्षाचे चित्रण हे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेच्या तुलनेत तीव्र स्वरूपाचे जाणवते. खाजगीकरण, उदरीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या बदलांचे चित्रण नव्वदोत्तरी मध्यवर्ती कथेत व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतही आहेत परंतु दोन्ही वर्तुळातील समाजजीवनावर उमटलेले खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद हे भिन्न पातळीवर चालताना दिसून येतात.

दोन्ही वर्तुळातील सामाजिक प्रश्नांमध्ये भेद असल्याचे आपल्याला दिसून येते. एकूण दोहोंमधील खा-उ-जा संस्कृतीच्या, दोन्ही वर्तुळातील साहित्याचा आशय विषयाचा अंतस्वरच पूर्णतः भिन्न जाणवतो. त्यामुळे नव्वदोत्तरी कालखंडातील मध्यवर्ती मराठी कथा व गोमंतकीय मराठी कथा या समांतर जात नाहीत तर प्रदेशानुरूप मानवी जीवनाच्या अनुभवकक्षेला आकार देताना दिसतात.

नव्वदोत्तर काळात स्त्रीच्या आत्मभानाचा आणि स्त्रीवादी विचारसरणीचा प्रभाव कथालेखनावर पडला. महाराष्ट्रातील आणि गोमंतकीय स्त्री कथालेखन यामध्ये काही समान पैलू दिसतात, तसेच काही महत्त्वाचे भेदही आढळतात. मध्यवर्ती मराठी साहित्य स्त्रीच्या सामाजिक परिवर्तनाबाबत अधिक मोकळेपणाने लिहिते. स्त्री-पुरुष समानता, विवाहबाह्य संबंध, स्त्री स्वातंत्र्य आणि करिअर या मुद्द्यांवर ते अधिक स्पष्टपणे बोलते. मध्यवर्ती कथेतील स्त्री संघर्षशील आहे. ती पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध लढा देते. स्त्री लिखित गोमंतकीय कथा स्त्रीच्या परंपरागत भूमिकांवर अधिक भर देते. नव्वदोत्तरी मध्यवर्ती स्त्री कथालेखन व गोमंतकीय स्त्री कथालेखनातही बराच भेद जाणवतो. नव्वदोत्तरी कालखंडातील मध्यवर्ती स्त्री कथा लेखनातील अनुभवविश्व हे विविधांगी असल्याचे जाणवते तर नव्वदोत्तरी गोमंतकीय लेखिकांचे अनुभवविश्व हे प्रामुख्याने स्त्री जीवनापुरते मर्यादित चित्रित झाल्याचे दिसून येते. ग्रामीण स्त्री जीवनचित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय लेखिकांच्या कथांतून दिसत नाही.

नव्वदोत्तरी कथेचा स्थायीभाव हा ग्रामीण किंवा सद्यकालीन खा-उ-जा संस्कृती व बदल हा असला तरी नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथा व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा समांतर जाते असे म्हणणे अयोग्य ठरते. मध्यवर्ती कथेने नव्वदोत्तरी कालखंडात स्वीकारलेली प्रयोगशीलता, कथेला लाभलेले दीर्घ स्वरूप, या निकषांवर दोन्ही कथा समांतर जात नाहीत. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर प्रामुख्याने पूर्वसुरींच्या गोमंतकीय कथाकारांच्या कथातंत्रांचाच पगडा दिसतो. स्वतःच्या अनुभवाच्या व तंत्राच्या कक्षेत वावरणारी नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा ही मध्यवर्ती मराठी कथेला समांतर न जाता स्वतःच्या वर्तुळात वावरताना दिसून येते.

## प्रकरण ७

## प्रकरण ७: नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन

हे प्रकरण नव्वदोत्तरी काळातील गोमंतकीय मराठी कथांचे वाङ्मयीन मूल्यमापन करते. या कथांचे कथानक, व्यक्तिरेखा, निवेदनशैली, संवादरचना, सांस्कृतिक संदर्भ आणि भाषाशैली यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. १९६१ मध्ये गोवा मुक्त झाल्यानंतर आणि विशेषतः १९९० नंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे गोव्याच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनात मोठे बदल झाले. या बदलांचे प्रतिबिंब गोमंतकीय मराठी कथांमध्ये उमटले आहे. नव्वदोत्तरी कालखंडात आधुनिक जीवनशैली, सामाजिक विसंगती, बदलती कुटुंबव्यवस्था आणि जागतिकीकरणामुळे झालेल्या मानसिक-सामाजिक परिणामांना अधिक महत्त्व मिळाले. हे प्रकरण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथांचा सखोल अभ्यास करते आणि त्या कथांमधील वाङ्मयीन वैशिष्ट्ये, कथालेखन शैली, निवेदनतंत्र, संवाद, भाषा आणि व्यक्तिरेखा यांचे मूल्यमापन करते.

नव्वदोत्तरी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन करत असताना 1990 पूर्व व1990 नंतरच्या कालखंडात कथालेखन करणाऱ्या पु. शी. नार्वेकर, गजानन रायकर यांच्या कथेचा सर्वप्रथम विचार करावा लागतो. त्यांची कथा सुरूवात, मध्य, अंत या रूळ साचात वावरते. गजानन रायकर यांच्या कथेतील व्यक्तिकेंद्रितता, वर्णनात्मकता, संवादात्मक पद्धतीने होणारी सुरुवात, प्रतिकात्मकतेचा वापर करत गुंफलेली कथाबीजे महत्त्वाची ठरतात. विठ्ठल गावस यांच्या कथेचा खुला समारोप हे महत्त्वाचे विशेष ठरते. चंद्रकांत गावस यांची कथा रूढ साच्यात वावरते. ज्ञानेश्वर कोलवेकर यांच्या कथेत कथनात्मक पद्धतीने कथाकथन करत तंत्र बांधणी झालेली दिसून येते. तसेच सुरूवातीला फ्लॅशबॅक तंत्राचा वापर करत संभ्रमावस्थेत असलेल्या निवेदकाच्या भूमिकेतून कथेची सांगता होताना दिसते. दयाराम पाडलोस्करांच्या कथेत मोठा कथावकाश व्यापलेला दिसून येतो. या एकूण विवेचनातून नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा लेखनाच्या अनुषंगाने विचार केल्या जाणवते की अत्यंत व्यापक अनुभवविश्व जरी असले तरी आशयाचे अनेक कंगोरे उलगडत घटना प्रसंगांच्या रचनेतून कथा लेखनाला दीर्घ कथेचे रूप लाभू न देता लघुरुपी कथेचा स्वीकार करत नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा तंत्रदृष्ट्या पूर्वसूरींच्या गोमंतकीय कथा लेखनाला समांतर जाताना दिसून येते.

मिलिंद म्हामल यांच्या कथेतील आकर्षक प्रारंभ, प्रभावी प्रतिकात्मकता व धक्कातंत्राचा वापर करत साधलेला शेवट महत्त्वाचा ठरतो. कथेच्या घटकांमध्ये समतोल साधत रूढ साचात अत्यंत गतिमान पद्धतीने कथेला आकार देणारे उदय नाईक महत्त्वाचे कथाकार आहेत. गजानन देसाई अत्यंत गतिमानतेने कथेची बांधणी करताना दिसून येतात तसेच फ्लॅशबॅक तंत्र, धक्कातंत्राचा वापर करत कथेची बांधणी होताना दिसून येते. अस्तित्ववादी स्वरूपाचे कथाविश्व निर्माण करणारे प्रयोगशील कथाकार म्हणून सु. म. तडकोड महत्त्वाचे कथाकार ठरतात. प्रतिकात्मकता, फ्लॅशबॅक, धक्कातंत्र, गतिमानता इत्यादी तंत्रे स्वीकारत नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा आपले वैशिष्ट्यपूर्ण रूप प्रकट करताना दिसून येते.

गोमंतकीय स्त्री कथाकारांमध्ये आरती दिनकर, मेघना कुरुंदवाडकर या स्त्री कथाकारांमध्ये आशयदृष्ट्या भिन्नता व नाविन्यता जाणवते पण घटकांच्या मोजमापात कथेच्या तंत्राला न्याय दिलेले जाणवत नाही. उदा. आरती दिनकर यांच्या 'वेगळी वाट' या कथेमध्ये घटना प्रसंगाचा अभाव जाणवतो. मेघना कुरुंदवाडकर यांच्या 'तिच्या आभाळाचा तुकडा' या कथासंग्रहातील दीर्घ असलेल्या काही कथा लांबीने दीर्घ असल्या तरी मर्यादितशील अनुभव घटकांच्या आवाक्यामुळे या कथा दीर्घ ठरत नाहीत कारण कुरुंदवाडकर यांच्या कथा अनुभव कथनाच्या पलीकडे जात नाही. ज्योती कुंकळकर, अंजली अमोणकर, सुजाता सिंगबाळ या लेखिकांनी नीटनेटक्या कथातंत्राचा स्वीकार केलेला दिसतो.

गजानन रायकर यांची काव्यात्मक शैली, विठ्ठल गांवसांच्या कथेला लाभलेली प्रतिकात्मकता, उदय नाईक यांच्या कथेतील घटना प्रधानता तसेच वातावरणनिर्मितीतून प्रकटणारी त्यांची स्वतंत्र शैली, गजानन देसाईंच्या कथेत गतआठवणीत रमत साकारत गेलेली कथा लेखन शैली, नारायण महालेंच्या कथेतील कलात्मकता कथा लेखनाचे शैली विशेष गजानन रायकर यांची काव्यात्मक शैली विठ्ठल गावस यांच्या कथेतील काव्यात्मकता अशा पद्धतीने नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकारांच्या कथालेखनातील शैलीविशेष स्वतंत्रपणे लक्षात येतात.

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील व्यक्तिचित्रणे ही 'गोवा' या प्रदेशाच्या संस्काराने पोषित झाल्याचे म्हणावे लागते. नव्वदोत्तरी कथेतील गोमंतकीयत्व या पात्रांच्या माध्यमातून व्यक्त होते. पु. शी नार्वेकर व्यक्तींचे अंतर्बाह्य चित्रण करतात. उदाहरणार्थ 'ब्लॅकिस्ट' या कथेतील रोबेर्तो. गोवा मुक्तिपूर्व काळ पात्रांच्या माध्यमातून लेखक जिवंत करतात. गोवा मुक्तिपूर्व कालखंडात पोर्तुगीजांच्या वासनेला बळी पडलेल्या गोमंतकीय स्त्री पात्रांचे

चित्रण नार्वेकरांच्या कथेत येते.  तटस्थ अशी स्त्री पात्रे त्यांच्या कथेत येतात. गोमंतकीय कथाकारांच्या कथालेखनातील पात्रे ग्रामीण व शहरी जीवन या दोहोंच्या सीमारेषा धुंडाळताना दिसून येतात. ग्रामजीवनाच्या संस्काराने पोषित झालेली ही पात्रे ग्रामजीवनाचा आधुनिक पद्धतीने होणारा विकास अंगीकारक शहरी जीवन स्वीकारतात तर कधी एका नव्या पिढीच्या शहरीकरणाच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या विचारसरणीला विरोध करत संघर्ष करतात. उदा. विठ्ठल गांवस यांच्या 'दर्याचं पूत' या कथेतील नानू कथासंग्रहातील 'लवण' या कथेतील दादू 'लिब्रूची इच्छा' या कथेतील लिब्रू ही पात्रे बदलांना विरोध दर्शवितात पण शेवटी त्यांना बदलांपुढे व नवीन विचारांच्या पिढीपुढे झुकते माप घ्यावे लागते. ही पात्रे हतबल होताना दिसतात. परंपरेशी निष्ठावान असलेली एक पिढी जी आतून असते पण गोवेकरांच्या स्वभावातच बंडखोरी नसल्याने ही पात्रे विद्रोहाचा सूर लावताना दिसून येत नाहीत. नवीन पिढीचे आचार विचार दर्शवणारी दुय्यम स्वरूपाची पात्रे शहरीकरणात स्वतःचा विकास साधतात. निवेदनाचा भाग म्हणून ओघवत्या पद्धतीने गांवसांच्या कथेत पात्रे येतात. वासनापीडीत पात्रे गांवसांच्या कथेत दिसून येतात. ग्रामीण स्त्री जीवनाच्या व्यथा विठ्ठल गांवस कथेतून मांडतात उदा. 'चंवर' या कथेतील शेवतें या आपल्या पत्नीची फसवणूक करून गेलेला पती परतल्यानंतर समर्पित होणारी शेवतें अशी परिस्थितीशी हतबल पात्रे कथेतून दिसून येतात. भावनाप्रधान, हतबल, उदात्त अशी पुरुष पात्रे चंद्रकांत गावस यांच्या कथेत येतात. उदा. 'दुसरी अहिल्या' या कथेत परपुरुषाशी संबंध ठेवूनही अनेक वर्षांनी आपल्या पत्नीला स्वीकारणारा किशोर हे उदात्त पात्र येते. ज्ञानेश्वर कुलवेकर यांच्या कथेतून भिन्न मानवी प्रवृत्तींचे चित्रण पात्रांच्या माध्यमातून होताना दिसते. उदा. 'फडफड' या कथेतील रुबाबदार व हाडकुळा तरुण अशी दोन पात्रे येतात. रुबाबदार तरुण हा नीतितत्त्वे न मानणारा पण जबाबदार, हाडकुळा तरुण हा नीतित्त्वांच्या ओझ्याखाली असलेला पण दु:खी अशी परस्पर विरोधी पात्रे कोलवेकरांच्या कथेत येतात. गजानन देसाईंच्या कथेत मानवी प्रवृत्तींचे चित्र दिसून येते. गजानन देसाईंच्या 'पराब' या कथेत अस्पृश्य म्हणून हिणवल्या गेलेल्या दलिताच्या जीवनाचे चित्रण येते. बदलांच्या अपेक्षेने स्वीकारलेली बंडखोर वृत्ती तरुणाच्या माध्यमातून लेखक चित्रित करतात तसेच परंपरेचा वृथा अभिमान बाळगणाऱ्या जुना पिढीच्या मनोवृत्तीचे चित्रण येते.

समूहाचा भाग असलेल्या एका विशिष्ट प्रमुख व्यक्तिरेखेच्या माध्यमातून म्हामलांची कथा आकार घेते. घेते. उदा. 'मांड' या कथेतील परंपरेशी एकनिष्ठ असलेली निष्ठावान ग्रामीण स्त्री दिसून येते. आधुनिक जीवन जगणाऱ्या समूहाच्या मानसिकतेचे चित्रण म्हामलांच्या कथेत येते. 'लेनिनग्राड' या कथेतील धनंजय या प्रमुख व्यक्तिरेखेच्या माध्यमातून आधुनिक काळातील ढासळलेली मूल्यव्यवस्था व मानसिकतेचे चित्रण होताना

दिसते. पर्यटन व्यवसायाचे समूहावर म्हटलेले पडसाद या व्यक्तिरेखा व्यक्त करतात. म्हामलांच्या कथेतील निवेदनाचा भाग म्हणून आलेल्या या व्यक्तिरेखा अनुभव, व्यक्ती, प्रसंग यांच्या मिश्रणातून अजून प्रभावी रंगवणे आवश्यक वाटते. नारायण महाले यांनी अत्यंत समर्थपणे कथांमधील व्यक्तिरेखांच्या जीवनव्यवहाराचे, जीवनशैलीचे अंतरंग उलगडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदा. ‘आमोरी’ या कथेतील व्यक्तिरेखा. माधवी देसाई यांच्या कथेत तटस्थ भूमिका स्वीकारणारी स्त्री पात्रे येतात. उदा. ‘अधांतर’ या कथेतील निलांबरी, ‘कैकयी’ या कथेतील रजनी. गोमंतकातील ख्रिस्ती माणसे माधवी देसाईंच्या कथेत पात्रे बनताना दिसतात. उदा. ‘लेडी डायना’ या कथेत गोवा मुक्तिनंतरच्या स्थित्यंतरावर भाष्य करत पोर्तुगीजांच्या गोमंतकीय पत्नींच्या व्यथा मांडत ‘डायना’ हे एक महत्त्वाचे स्त्री पात्र येते. आयुष्यभर आपल्या पोर्तुगीज प्रियकराच्या परतीसाठी आसुसलेली ख्रिस्ती स्त्री डायनाच्या माध्यमातून लेखक चित्रित करतात. तसेच ‘फ्रॅंक’ या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून गोमंत भूमीशी बांधलेल्या ख्रिस्ती व्यक्तीचे चित्रण येते. 1990 नंतरच्या स्त्री कथाकरांच्या लेखनात मध्यमवर्गीय व्यक्तिरेखा दिसून येतात.

प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी निवेदन पद्धतींचा अवलंब करत ओघवत्या पद्धतीने कथेचे निवेदन येते. उदा. गजानन रायकर यांच्या ‘दादूली’, ‘गणेश’, ‘झंपला! प्रेम रंगला’ यात प्रथमपुरुषी निवेदन पद्धतींचा वापर करत निवेदक हा कथेतील पात्र असल्याचे जाणवते. चंद्रकांत गावसांच्या कथेतही निवेदक हा कथेचा भाग म्हणून येत प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा अवलंब केल्याचे दिसते. उदा. ‘तो’, ‘राधा’ या कथा. दयाराम पाडलोस्कर प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा वापर करतात. निवेदक हा कथेतील महत्त्वाचे पात्र म्हणून आलेला दिसतो. निवेदक हा प्रमुख पात्र असल्याने पाडलोस्कारांच्या कथा या निवेदकाच्या कथा ठरतात. उदा. ‘रानफुल’ ही कथा. प्रथम पुरुषी निवेदक अनेकदा पाडलोस्कर या नावानेच येतो. उदा. ‘अवगत’ ही कथा. पाडलोस्कर तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीचाही वापर करताना दिसून येतात पण प्रथमपुरुषी निवेदन पद्धती प्रभावीपणे वापरलेली दिसून येते. तसेच गजानन देसाई प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा प्रभावी वापर करतात. निवेदक हे प्रमुख पात्र असल्याचे जाणवते. तसेच ‘अवूर’, ‘दान दक्षिणा’ या कथांमध्ये तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीचाही वापर केलेला दिसून येतो. मिलिंद म्हामल यांच्या कथेतील निवेदक हा कथेच्या केंद्रस्थानी नसतो तर त्रयस्थपणे कथेतील पात्रांच्या जीवनावर कथा निवेदन करतो. उदा. ‘शेकडेकारनीचे पांडव’ या कथेत सलूनमध्ये केस कापण्यास गेलेला निवेदक लोकांच्या बोलण्यातून अनेक गोष्टी समजल्यानंतर शेकडेकारनीच्या कुटुंबाची शोकांतिका मांडतो. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी स्त्री कथाकार वर्णनात्मकता व प्रतिकात्मकतेचा अंतर्भाव निवेदनात करताना दिसतात. उदा.

माधवी देसाई यांच्या 'कथा सावलीची', या कथेत वृक्ष व मुळाशी असलेली सावली स्त्री-पुरुष नातेसंबंधांवर भाष्य करतात. लालित्यमय वर्णनातून लेखिका माधवी देसाई निवेदनाचा एक उत्कृष्ट आविष्कार साधतात. स्त्री जीवनाकडे पाहण्याचा डोळसपणा व संवेदनशीलता माधवी देसाई यांच्या कथेत दिसते. प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीचाही वापर त्या करताना दिसून येतात. 'जीवन, व्यवहार व काव्य' या माधवी देसाईंच्या कथेच्या निवेदनातील काव्यात्मकता, स्त्रीच्या कोमल भावविश्वाचे निवेदन काव्यपंक्तीच्या माध्यमातून दिसते. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा लेखिकांच्या लेखनात दिसूत येणारी काव्यात्मकता व प्रतिकात्मकता ही निवेदन शैलीचे महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणावी लागतात.

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथाकारांनी रचलेल्या कथेचा घाट हा सुरूवात, मध्य, अंत या साच्यात वावरताना दिसतो. या कथेतून कलात्मक असा प्रारंभ व शेवट, व्यक्तिचित्रण करण्याच्या भिन्न पद्धती, गोमंतकीय मराठी कथेमधील वातावरण निर्मिती करत असताना आलेली वर्णने, दृश्यात्मक शब्दयोजना, नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी निवेदनपद्धतींबरोबर निवेदनात आलेले कोंकणी भाषेतील भिन्न बोलीतल संवाद, प्रादेशिक शब्दांची पेरणी, वेगवेगळ्या म्हणी, वाक्प्रचारांचा वापर, प्रतिमा प्रतीकांच्या वापरातून कथेला लाभलेले शब्दसौंदर्य गोमंतकीय कथेला वैशिष्ट्यपूर्ण रूप प्रदान करताना दिसून येतात.

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापनातून गोमंतकीय कथेचे कथातंत्र हे सुरूवात, मध्य व अंत या साच्यात वावरताना दिसून येते. नव्वदपूर्व गोमंतकीय कथाकारांनी अवलंबिलेल्या कथातंत्राचा वापर नव्वदोत्तरी कथाकारांच्या कथालेखानातून दिसून येतो. मेघना कुरुंदवाडकर, प्रतिभा कारंजकर यांच्या कथेने संख्यात्म दृष्ट्या भर घातलेली असली तरी कथेच्या घटकांचा अभाव दिसल्याने अवलंबिलेल्या कथातंत्राची मर्यादा लक्षात येते. वर्णनात्मकता ही नव्वदोत्तरी कथाकारांच्या निवेदनशैलीचे वैशिष्ट्य म्हणावे लागते. गोमंतकीय वातावरण, व गोव्यातील बदलांच्या पार्श्वभूमीवर वातावरणनिर्मिती ही कथा करते. त्याचप्रमाणे गोमंतकीय कोंकणी भाषेतील भिन्न बोलींतील संवाद, कोंकणी शब्द, कोंकणी म्हणी इत्यादींच्या माध्यमातून नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा आपले गोमंतकीयत्व सिद्ध करताना दिसून येते.

## प्रकरण ८

## उपसंहार व निष्कर्ष

प्रबंध विषयातील निष्कर्षांची मांडणी आठव्या 'निष्कर्षा'च्या प्रकरणाद्वारे झालेली आहे. काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे.

1. कथन करण्याच्या सहज प्रवृत्तीपासून, कहाणी, गोष्ट ते आजच्या लघुकथेपर्यंत आकार घेणारे, लघुत्व किंवा स्फुट रूप हे लघुकथेचे स्वतंत्र असे गद्य स्वरूप होय .
2. स्फुट असला तरी कथेच्या स्वतंत्र स्वरूपाचा विचार केल्यास समृद्ध असे तंत्र लाभलेला व काळाबरोबर अनेक अंगानी विकसित होणारा, संपन्न कलानुभव देण्याची क्षमता असलेला 'कथा' हा महत्त्वाचा साहित्यप्रकार ठरतो.
3. कथेच्या लघुत्वाला महत्व देत अनेक घटकांच्या एककेंद्रीयत्त्वातून उत्कट अशी परिणामकारकता साधणार एक महत्त्वाचा साहित्यप्रकार म्हणून कथा या साहित्यप्रकाराचे स्वरूप लक्षात येते.
4. कथा लिखित स्वरूपात आल्यानंतर कथेला कलात्मक घाट देण्याचा प्रयत्नही झाला. रूपकात्मकता, अद्भुताची योजना, फॅंटसी, मिथचे तत्त्व, निवेदनाचा विशिष्ट घाट इत्यादी तंत्रांचा कथेने नाविन्यपूर्ण पद्धतीने वापर केल्याचे दिसून येते. कथेचे तंत्र विकसित होताना कालानुरूप कथा लेखनाच्या प्रयोजनामध्ये बदल घडत गेल्याचे दिसून येतात. तसेच काळाबरोबर कथेच्या आशय विषयांची वृद्धी होताना आपल्याला दिसून येते.
5. कथेतून घटकांच्या आधारे वास्तवाची अनुकृती साधली जाते. जाणीवेच्या व नेणीवेच्या पातळीवरील वास्तवाबरोबर कथा स्वप्नरंजनातील (nostalgia) जाणिवांच्या अनुभवविश्वाला आकार देत असते. अनुभवविश्वाच्या या वैविध्यतेमुळे कथा या साहित्यप्रकाराला वैविध्यपूर्ण असे रूपबंध लाभलेले दिसते.
6. मराठी कथेच्या विकासाच्या कालखंडात गोमंतकीय मराठी कथा नियतकालिकातून मोठ्या प्रमाणात लिहिली गेल्याकारणाने १९३० पर्यंतच्या कथेची वृद्धी झालेली दिसून येते.
7. गोमंतक मराठी कथेच्या पायाभरणीच्या काळात कथा लेखिकाही लेखन करताना दिसून येतात.
8. गोवा मुक्तिपूर्व कालखंडात फ्रेंच, पोर्तुगीज अनुवादित स्वरूपातील कथा गोमंतकीय मराठी कथेचे दालन समृद्ध करताना दिसून येतात.

9. १९२६ मध्ये वि. स. सुखटणकरांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहातून 'प्रादेशिक साहित्य' ही संकल्पना निर्माण करून प्रादेशिक कथा लेखनाच्या नवीन वाटा निर्माण केल्याचे दिसून येते.
10. नवकथेच्या आधी लक्ष्मणराव सरदेसाई यांनी मनोविश्लेषणात्मक स्वरूपाची कथा लिहिलेली दिसून येते.
11. गोवा मुक्तीनंतरची मराठी कथा ही मुख्य साठोत्तरी काळातील मध्यवर्ती कथेशी समांतर जाणारी कथा ठरते.
12. १९६० नंतरच्या गोवा मुक्तीनंतरच्या कथेवर गोमंतकातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय बदलांचे पडसाद उमटलेले दिसून येतात.
13. १९९० पूर्व व १९९० नंतरच्या सुरूवातीच्या कालखंडात लेखन करणारे पु. शी. नार्वेकर, गजानन रायकर, विठ्ठल ठाकूर यांच्या कथा लेखनामध्ये गोवा मुक्तीसंग्रामाचे संदर्भ तसेच गोवा मुक्तीनंतरच्या सामाजिक, राजकीय बदलांचे चित्र दिसून येते.
14. पु. शी. नार्वेकर व गजानन रायकर यांच्या कथेत गोवा मुक्तीपूर्व कालखंडाच्या पार्श्वभूमीवर पोर्तुगीज सत्तेतील अन्याय अत्याचारांचे चित्र दिसून येते.
15. पु. शी. नार्वेकर पोर्तुगीज कालीन स्त्रीवर झालेल्या अन्यायाचे चित्रण करत मिथकांच्या आधारे सद्यकालीन स्त्रीच्या जीवनावर भाष्य करताना दिसून येतात.
16. गजानन रायकर यांच्या कथा कुळ मुंडकार संस्कृतीचे चित्रण करत कुळांच्या व्यथा मांडताना दिसून येतात.
17. गजानन रायकर व पु. शी. नार्वेकर यांच्या कथांमध्ये भिन्न मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण आढळते त्यामुळे ही कथा मुक्तीपूर्व गोमंतकीय मराठी कथेशी नाते सांगणारी ठरते.
18. गजानन रायकर व्यक्तीकेंद्री कथा लिहिताना दिसून येतात.
19. पु. शी. नार्वेकर व गजानन रायकर यांच्या कथांमध्ये प्रेम भावना दिसून येतात. नार्वेकरांच्या कथेत दिसून येणाऱ्या कथा या असफल प्रेमाच्या कथा आहेत तर रायकरांच्या कथेत प्रेम भावनेतील उत्कटता दिसून येते.
20. विठ्ठल ठाकूर यांच्या कथेत मनोविश्लेषणात्मकता दिसून येते. मानवी स्वभाव विकृतींवर भाष्य करणाऱ्या या कथेवर नवकथेचा प्रभाव दिसून येतो.

21. मानवी जीवन व्यवहार व भावनिक पातळीवरील द्वंद्व हा विठ्ठल ठाकूर यांच्या कथा विश्वातील आशयाचा महत्त्वाचा भाग ठरतो.

22. विठ्ठल गांवस यांच्या कथा ख्रिस्ती समाज जीवन चित्रण करत, समाज वास्तवाचा वेध घेत सुशिक्षितांच्या मानसिक कोंडीचे चित्रण करताना दिसून येतात.

23. विठ्ठल गांवसांची कथा गोव्यातील घटना प्रसंगांच्या पडसादाचे चित्रण करत गोव्यातील सत्तेच्या राजकारणाचे हुबेहूब चित्र साकारते.

24. समाजातल्या भिन्नस्तरावरील, मध्यमवर्गापासून ग्रामजीवनापर्यंतच्या स्त्री जीवनाचा व स्त्री प्रश्नांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न विठ्ठल गांवस यांची कथा करते.

25. नारायण महाले यांची कथा सामाजिक व नैतिक मूल्य ऱ्हासाचे चित्रण करते.

26. माध्यम प्रश्न, कुळ मुंडकारांचे प्रश्न अशा गोव्यातील ज्वलंत प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवत नारायण महाले कथालेखन करताना दिसून येतात.

27. मिलिंद म्हामल यांच्या कथेत आधुनिक जगण्यात निर्माण झालेल्या गोव्यातील बदलांचे, आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेल्या भाऊबंदकीच्या प्रश्नांचे चित्रण दिसून येते.

28. मिलिंद म्हामल यांची कथा स्त्री जीवनाचे चित्रण करताना दिसून येते.

29. मिलिंद म्हामल यांची कथा पर्यावरणीय प्रश्नांवर भाष्य करण्याचा प्रयत्न करते.

30. चंद्रकांत गावस यांच्या कथेत समाजभान, उदात्त प्रेम व मानवी वासना विकृतीचे चित्रण दिसून येते.

31. चंद्रकांत गावस लिखित 'किस्से पर्यावरणाचे' या बालकथासंग्रहातून पर्यावरणाविषयीची सजगता दिसून येते.

32. ज्ञानेश्वर कोलवेकर हे स्वतः गोव्यातील सोनार समाजातील असल्याकारणामुळे त्यांच्या बहुतांशी कथा या गोव्यातील सोनार समाजाचा व्यवसायिक संघर्ष मांडणाऱ्या ठरतात.

33. ज्ञानेश्वर कोलवेकरांच्या कथेमध्ये स्त्री दुःख, भावनाविवशता व स्त्री स्वभावाच्या भिन्न पैलूंचे चित्रण येते.

34. ज्ञानेश्वर कोलवेकर आपल्या कथेमधून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न करत गोव्यात परप्रांतीयांमुळे निर्माण झालेले प्रश्न मांडतात.

35. सु. म. तडकोड यांच्या अस्तित्ववादी स्वरूपाच्या कथेत, आधुनिक नातेसंबंधातील ताणेबाणे तसेच महानगरीय जाणिवा व्यक्त होताना दिसतात. ही कथा आधुनिक जीवनातील विसंगती टिपत मानवी अस्तित्वाचे विविध कंगोरे शोधण्याचा प्रयत्न करते.

36. उदय नाईक यांची कथा समाजात बळावलेल्या प्रवृत्तींचे चित्रण करत मानवतावादी दृष्टिकोनाला केंद्रस्थानी ठेवून सामाजिक स्पंदने व्यक्त करते.

37. उदय नाईक यांच्या कथेमध्ये बोध प्रधानता दिसून येते.

38. पेशाने पोलीस असलेले दयाराम पाडलोस्कर हे अनेक सत्य घटनांच्या आधारे कथालेखन करताना दिसून येतात.

39. संमिश्र असे अनुभव विश्व हे लेखक दयाराम पाडलोस्कर यांच्या जगण्याचा भाग बनलेले आहे त्यामुळे कृषी जीवनातील त्यांच्या अनुभवविश्वाचा अस्सलपणा, समाज वास्तव, तसेच आधुनिक जगण्यातील बदलांचे चित्र मांडण्यास ही कथा सक्षम ठरते.

40. दयाराम पाडलोस्कर कथेची शोकांतिक स्वरूपाची मांडणी करताना दिसून येतात.

41. नव्वदपूर्व व नव्वदोत्तरी कालखंडात अविरतपणे लेखन करणाऱ्या स्त्री कथाकारांमध्ये वासंती नाडकर्णी यांचे अनुभवसंपन्न असे विश्व कथेतून येताना दिसते.

42. स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण करणाऱ्या माधवी देसाईंच्या काही कथांमधून माणसाच्या हदबलतेच्याही कहाण्या आलेल्या दिसून येतात.

43. आरती दिनकर यांनी विशुद्ध विनोदी स्वरूपात काही कथा लिहित नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखनातील आशयविश्वात नाविन्यपूर्णता आणण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

44. अंजली आमोणकर यांच्या कथालेखनात काही रहस्यकथा आल्याचे दिसून येते.

45. नव्वदोत्तरी कालखंडात लेखन करणाऱ्या बहुतांशी लेखिकांच्या कथालेखनात स्त्रीचे भावविश्व, स्त्री जीवनाच्या शोकांतिका, स्त्री स्वभावाच्या भिन्न छटा, आधुनिक स्त्री जीवन, स्त्रीचे प्रश्न, स्त्री मधील तटस्थपणा, आधुनिक नातेसंबंध अशा स्त्री जीवनाशी निगडित भिन्न आयामांना मांडण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे नव्वदोत्तरी स्त्री कथालेखन हे एकसुरी होत असल्याचे आपल्याला दिसून येते.

46. माधवी देसाई, हेमा नाईक या स्त्रियांच्या लेखनामध्ये स्त्रीवादाची छटा दिसून येते. स्त्री जीवन व स्त्री जाणिवांशी समरस होणाऱ्या नव्वदोत्तरी गोमंतकीय लेखिका सामाजिक प्रवृत्तीं विरोधी बंडखोर भूमिका स्वीकारताना दिसत नाहीत.

47. बहुतांशी नव्वदोत्तरी लेखिका या गोव्याबाहेरून येत गोव्यात वास्तव्यास असल्याकारणाने गोमंतकीय ग्रामीण जीवन हे तिच्या अनुभवकक्षेच्या पलीकडचे असल्याने ग्रामीण स्त्री व ग्रामीण स्त्रीच्या व्यथा या त्यांच्या कथालेखनात आलेल्या दिसून येत नाहीत.

48. नव्वदोत्तरी गोमंतकीय लेखकांच्या कथेमध्ये दोन पिढी मधील संघर्षाचे चित्र रेखाटलेले दिसून येते.

49. नव्वदोत्तरी लेखकांच्या कथेत आधुनिक, मध्यमवर्गीय, ग्रामीण अशा भिन्न पातळीवरील स्त्री जीवन, स्त्री जीवनाची विवंचना, कुळांच्या स्त्रियांच्या व्यथा, गोमंतकीय स्त्री जीवनाची दुःखे व संघर्षाचे चित्रण आलेले दिसते.

50. नव्वदोत्तरी कालखंडातील गोमंतकीय मराठी कथा लेखक ग्रामीण समाजव्यवस्थेवर भाष्य करताना दिसून येतात.

51. ग्रामीण भागात अवलंबल्या जाणाऱ्या वेगवेगळया शेती पद्धतींचे चित्रण करत कृषी संस्कृती व कृषी संस्कृतीशी निगडित प्रश्नांचे चित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत होताना दिसते.

52. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील बहुतांशी कथाबीजे ही गोमंतकीय रुढी परंपरा व समजूतींवर आधारलेली दिसून येतात.

53. नव्वदोतरी गोमंतकीय कथेतील ग्रामजीवन हे 'गोवा' या प्रदेशाच्या कक्षेत वावरताना दिसते. प्रदेशनिष्ठा व्यक्त करणारे गोमंतकातील उत्सव, समजूती, इथल्या भिन्न धर्मीय लोकांच्या वेगवेगळया प्रथा परंपरा, राहणीमान या गोष्टींना कवेत घेत वैशिष्ट्यपूर्ण अशी प्रदेशनिष्ठा व्यक्त करता ग्राम जीवनाचे चित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून होते.

54. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ही भिन्न अनुभवविश्वाचा आविष्कार करते. त्यामुळे नव्वदोत्तरी कथाकारांमध्ये पूर्णपणे एखाद्या कथाकाराला ग्रामीण कथाकार म्हणजे अयोग्य ठरते. ग्रामीण जीवनचित्रण हे नव्वदोत्तरी कथेचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागते.

55. १९९० पूर्व गोमंतकीय कथेतून दिसून येणाऱ्या निसर्गचित्रण, प्रदेशचित्रणाच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या प्रादेशिकतेच्या तुलनेत १९९० नंतरच्या कथेतून निसर्गचित्रणातून व प्रदेशचित्रणातून

'प्रादेशिकता' प्रभावी होताना दिसत नाही. १९९० नंतरची गोमंतकीय मराठी कथा ही प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या बदलांचा व प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न करते.

56. नव्वदोत्तरी कालखंडात बहुतांशी गोमंतकीय कथा एकाच वेळी प्रादेशिकता व ग्रामीणतेशी निगडित जीवनानुभव व्यक्त करत असल्याने गोमंतकीय मराठी कथा ही पूर्णपणे प्रादेशिक किंवा पूर्णपणे ग्रामीण असे न म्हणता ही कथा ग्रामीण व प्रादेशिक या मधली अवस्था असल्याकारणाने या कथेला 'गोमंतकीय कथा' असा सांकल्पनिक सुबोध देणे योग्य ठरते.

57. गोवा हे राज्य क्षेत्रफळाच्या दृष्टीने अत्यंत छोटे असल्याकारणामुळे कामानिमित्त नोकरीधंद्यामुळे गावातून शहरातकडे जाणाऱ्या किंवा शहरातून गावाकडे येणाऱ्या गोव्यातील माणसाचे अनुभवविश्व हे भिन्न पातळीवर वावरत असल्याकारणामुळे प्रत्येक गोमंतकीय कथाकारांच्या कथेमध्येही विशिष्ट कक्षेत मावणारे अनुभवविश्व न येता, भिन्न पातळीवरचे अनुभवकथन आशयसूत्रांच्या मांडणीतून दिसून येते.

58. आधुनिकीकरणामुळे व जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण करत शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या गोमंतकाचे चित्र नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत दिसून येते.

59. खाण व्यवसाय, आधुनिक जीवनपद्धतीमुळे फोफावल्या जाणाऱ्या खा-उ-जा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या बदलांचे चित्र नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेमधून दिसून येते. शेती व्यवसायाला फाटा देत निर्माण झालेल्या खाजगी कारखान्यांचे चित्रण व दुष्परिणाम विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल यांच्या कथेमध्ये होत खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद कथेमधून दिसून येतात.

60. ग्रामीण जीवन आणि आधुनिकीकरण या दोहोंच्या सीमारेषा धुंडाळणारा गोमंतकीय समाज हा नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून व्यक्त झालेला आहे.

61. जागतिकीकरणाच्या ओघात विकसित झालेले पर्यटन आणि पर्यटनामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, दयाराम पाडलोस्कर या कथाकारांच्या कथांमधून दिसून येते.

62. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेमध्ये खा-ऊ-जा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या बदलांचे पडसाद पर्यटन व्यवसाय, कॅसिनो, खाण व्यवसाय, कंपन्या प्रस्थापित करण्यासाठी शेत जमिनींचे झालेले हस्तांतरण, जागेसाठी निर्माण झालेले भाऊबंदकीचे प्रश्न, परदेशी गेलेल्या ख्रिस्ती खलाशांच्या

जीवनाच्या वाताहती, जुन्या नव्या पिढीचा संघर्ष, चंगळवादी संस्कृती अशा विषयांपुरतेच मर्यादित राहिलेले दिसून येतात.

63. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ही स्वप्नरंजनातून अनुभवविश्वाला आकार देत प्रथमपुरुषी निवेदनपद्धती स्वीकारताना दिसून येतो.

64. पारंपारिक पद्धतीने सुरूवात, मध्य, अंत या साच्यात नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील अनुभवविश्व आकार घेताना दिसून येते.

65. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत कोंकणी भाषा व गोव्यातील पेडणे पासून काणकोण तालुक्यात बोलल्या जाणाऱ्या कोंकणीच्या बोलींची भिन्न रूपे संवादातून दिसून येतात.

66. नव्वदोत्तरी कथेचा विचार करत असताना कथा लेखन करणारी तरुणांच्या फळीतून निर्माण होणारी पाचवी पिढी गोमंतकीय कथेतून लेखन करताना दिसत नसल्याने आजचे आधुनिक जीवन, विज्ञान तंत्रज्ञानातील बदलांचे पडसाद जे समाजमानसावर उमटलेले आहेत त्याचे पडसाद लेखनातून उमटताना दिसत नाहीत. नव्वदोत्तरी मध्यवर्ती कथेच्या प्रवाहात लेखन करणाऱ्या तरुण लेखक पिढीच्या समांतर गोमंतकीय कथा जाताना दिसत नसल्याने ही या काळातील कथालेखनाची मर्यादा म्हणावी लागते.

67. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून शेतकऱ्याचा, कुळांचा संघर्ष जाणवतो पण हा संघर्ष मध्यवर्ती कथेच्या तुलनेत विद्रोहाच्या पातळीवर येताना दिसत नाही. बऱ्याच प्रमाणात हा संघर्ष व्यवस्थेविरुद्धचा नसून व्यवस्थेतून बाहेर पाडण्याचा असल्याने विद्रोहाच्या पातळीवर पोहोचत नाही.

68. मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथेतील बहुतांशी लेखन हे महानगरीय जाणिवा केंद्रस्थानी ठेवत लिहिल्याने अनुभवांची व्यापकता आपल्याला दिसून येते. गोवा हे राज्य शहरीकरणाच्या प्रक्रियेत आहे, राज्य यंत्रणेचा अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या प्रयत्नात असलेल्या गोव्याचे प्रश्न वेगळे आहेत. कॅसिनो, पर्यटन या गोष्टींमुळे समाजजीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यामुळे अनुभवांची पृथगात्मकता गोमंतकीय कथा व मध्यवर्ती मराठी कथेत जाणवते. खा-ऊ-जा संस्कृती हा नव्वदोत्तरी मध्यवर्ती कथेचा व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचा एक स्थायी भाव असला तरी मध्यवर्ती कथेच्या प्रभावाने हे पडसाद गोमंतकीय कथेवर उमटल्याचे म्हणता येत नाही. दोन्ही कथेतून उमटणारे जीवनानुभव स्वतंत्र व स्वयंभू आहेत व त्या त्या प्रांतातील समाजजीवनातील बदलांनुसार आकार घेत असल्याचे म्हणावे लागते.

69. मध्यवर्ती स्त्री कथाकारांच्या तुलनेत माधवी देसाई या लेखिका सोडल्यास गोमंतकीय मराठी लेखिकांच्या कथेतून मर्यादित स्वरूपाचे स्त्रीचे अनुभवविश्व आलेले दिसून येते.

70. मध्यवर्ती नव्वदोत्तरी मराठी कथेला लाभलेले दीर्घत्व व मध्यवर्ती नव्वदोत्तरी मराठी कथेत निवेदनात दिसून येणारी प्रयोगशीलता नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत दिसून येत नाही.

71. कोंकणी भाषेतील स्थानिक शब्द अकृत्रिमरित्या व सहजपणे लेखनातून आलेले दिसून येतात. त्यामुळे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे भाषिक सौंदर्य हे या कथेचे वैशिष्ट्य म्हणावे लागते.

72. कथेच्या निवेदनातील सहजपणा, सोपी व ओघवती कथालेखन शैली हे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वैशिष्ट्य म्हणावे लागते.

73. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर प्रामुख्याने पूर्वसुरींच्या गोमंतकीय कथाकारांच्या कथातंत्रांचाच पगडा दिसतो.

74. मेघना कुरुंदवाडकर, प्रतिभा कारंजकर या लेखिकांच्या कथेने संख्यात्म दृष्ट्या भर घातलेली असली तरी कथेच्या घटकांचा अभाव त्यांच्या कथालेखनात दिसत असल्याने त्यांनी अवलंबिलेल्या कथातंत्राची मर्यादा लक्षात येते.

75. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत अस्तित्ववादी स्वरूपाची आशयनिर्मिती करणारे व एक प्रयोगशील कथाकार म्हणून सु. म. तडकोड यांचा विचार करावा लागतो.

76. काव्यात्मकता ही नव्वदोत्तरी कथाकारांच्या निवेदनशैलीचे वैशिष्ट्य म्हणावे लागते.

77. कथा लेखनाच्या प्रारंभाच्या टप्प्यापासून मध्यवर्ती कथेला समांतर जाणारी गोमंतकीय मराठी कथा साठोत्तरी कालखंडात निर्माण झालेल्या ग्रामीण प्रवाहाचा स्वीकार करते. नवकथेत दिसून येणारी मनोविश्लेषणात्मकताही या कथेत दिसून येते, पण नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथेचा व नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा गाभा ग्रामीण जीवन चित्रण किंवा आधुनिक जगण्यातील संघर्ष हा असला तरी विषय आशयाच्या, अभिव्यक्तीवैशिष्ट्यांच्या अनुषंगाने नव्वदोत्तरी मध्यवर्ती कथा व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा समांतर जाताना दिसत नाही.

# संदर्भसूची

## अ) ग्रंथसूची


1. संपा. नाडकर्णी, एस्., एस्., सोमनाथ कोमरपंत. *गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड दुसरा (मुक्तीनंतरचा कालखंड)*. गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी गोवा. २००३.
2. जगनाळे, रेखा. *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*. विजय प्रकाशन, नागपूर. २००७.
3. कुलकर्णी गो. म. *मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह*. मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे. १९९९.
4. मंचरकर, रत्नाकर बापू. *एकोणिसशे साठ नंतरची ग्रामीण कादंबरी*. 'ग्रामीण साहित्य विशेषांक'. म.सा.प. (सं. डॉ. आनंद यादव). १९८०.
5. तोरो. अ. रा. *आधुनिक मराठी ललित वाङ्मयातील प्रादेशिकता, उद्गम आणि विकास (मराठी कादंबरीतील प्रादेशिकता मधून उद्धृत)*. १९८२.
6. कोत्तापल्ले, नागनाथ. *ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध*. स्वरूप प्रकाशन.
7. कानोळकर, बाळकृष्ण. *प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांची कथा: एक शोध*. गोमंतक मराठी अकादमी, मार्च २००५.
8. शेवडे, इंदुमती. *मराठी कथा : उगम आणि विकास*. सोमय्या पब्लिशिंग हाउस, मुंबई.
9. शोभणे, रवींद्र. *जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य*. विजय प्रकाशन, नागपूर. २०११.
10. गोखले, कैलाश., नंदकुमार कामत, नितेश उगवेकर, 'Tourism and Socio-Cultural Implications A Study Of Selected Tourist Destination of South Goa District, Goa-India'. *जर्नल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्स (IOSR-JHSS)* खंड १९. अंक १०. (ऑक्टो. २०१४).
11. रसाळ, सुधीर, *निवडक सुधीर रसाळ.*
12. कानडजे एस. एम. *पीळ आणि पैलू (रा रं बोराडे यांच्या साहित्याचा अभ्यास)*. प्रतिभास प्रकाशन, परभणी. प्रथमावृत्ती २००४.
13. डॉ. ठाकूर रवींद्र. *साहित्यिक आनंद यादव*. बळीवंश प्रकाशन, नांदेड. प्रथमावृत्ती २०११.

14. लुलेकर प्रल्हाद जी., सतीश बडवे (संपा.). मराठवाड्यातील साहित्य. कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २००७.

15. सुरवडे, मनोहर. *१९८० नंतरची ग्रामीण कथा*. बळीवंश प्रकाशन, नांदेड. प्रथमावृत्ती २०१०.

16. शोभणे, रवींद्र. *जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य*. विजय प्रकाशन, नागपूर. २०११.

17. हातकणंगलेकर म. द. *मराठी कथा: रूप आणि परिसर*. श्रीविद्या प्रकाशन, पुणे. २००८.

18. लोमटे, आसाराम. *इडा पिडा टळो*. देशमुख आणि कंपनी, पुणे. २००८.

19. गजेंद्रगडकर, मोनिका. *आर्त*. मौज प्रकाशन गृह, मुंबई. २००८.

20. गजेंद्रगडकर, मोनिका. *त्रिपर्ण*. मौज प्रकाशन गृह, मुंबई. २००८.

21. तांबे, सतीश. *मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट*. रोहन प्रकाशन, २०२०.

22. तांबे, सतीश. *मॉलमध्ये मंगोल*. प्रकाशक: मीना कर्णिक, २०१३.

23. तांबे, सतीश. *ना. मा. निराळे*. वॉटरमार्क पब्लिकेशन, २०१५.

24. लोमटे, आसाराम. *आलोक*. शब्द पब्लिकेशन. मुंबई, २०१०.

25. येले, किरण. *तिसरा डुळा*. ग्रंथाली प्रकाशन, २०१९.

26. येले, किरण. *मोराची बायको*. ग्रंथाली प्रकाशन, २०१८.

27. पवार, जयंत. *फिनिक्सच्या राखेतून उठला मोर*. लोकवाङ्मयगृह, २०१०.

28. बोकील, मिलिंद. *उदकाचिया आर्ती*. मौज प्रकाशनगृह, १९९४.

29. ऐनापुरे, जी. के. *कांदाचिर*. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. २००५.

30. थोरात, हरिश्चंद्र. *कथनात्म साहित्य आणि समीक्षा*. शब्द पब्लिकेशन, २०११.

31. जोशी, प्रतिमा. *दण्डकारण्य*. लोकवाङ्मयगृह, २०१५.

32. कुरुलकर, पंकज. डेड *एण्ड*. ग्रंथायन प्रकाशन, २००९.

33. कुरुलकर, पंकज. *साकी: बार ॲण्ड रेस्टॉरण्ट*. मॅजेस्टिक प्रकाशन, २०००.

34. नीरजा. *ओल हरवलेली माती*. पॉप्युलर प्रकाशन, २००६.

35. पेठे, मेघना. *हंस अकेला*. राजहंस प्रकाशन, १९९७.

36. सखदेव, प्रणव. *निळ्या दाताची दंतकथा*. रोहन प्रकाशन, पुनर्मुद्रण २०२०.

37. संपा. पुरोहित के. ज., सुधा जोशी. *मराठी कथा विसावे शतक*. मॅजेस्टिक प्रकाशन, २००४.

38. खडस, समर. *बकऱ्याची बॉडी*. शब्दालय प्रकाशन, २००९.

39. किणीकर, रॉय. *आंधळे रंग पांगळ्या रेषा*. डायमंड पब्लिकेशन, २००७.

40. संपा. कोलारकर, राम. *सर्वोत्कृष्ट मराठी कथा खंड १ : १८५४ – १९२४*. पॉप्युलर प्रकाशन, १९६८.

41. संपा. कोलारकर, राम. *सर्वोत्कृष्ट मराठी कथा खंड २ (पूर्वार्ध): १९२१ – १९३४*. पॉप्युलर प्रकाशन, १९७७.

42. संपा. कोलारकर, राम. *सर्वोत्कृष्ट मराठी कथा खंड २ (उत्तरार्ध): १९३५ – १९४४*. पॉप्युलर प्रकाशन, २००६.

43. संपा. भालेराव, इंद्रजित. *निवडक भास्कर चंदनशिव*. लोकवाङ्मयगृह, २००९.

44. सरदेसाई, लक्ष्मणराव. *लक्ष्मणरेषा*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९५७.

45. सरदेसाई, लक्ष्मणराव. *वेचक लक्ष्मणराव सरदेसाई*. सन पब्लिकेशन्स, १९८६.

46. कामत, जयराम. *क्रांतिदूत*. सागर साहित्य प्रकाशन, गोवा. १९८२.

47. कामत, जयराम. *अंधारयात्री*. मित्रसमाज प्रकाशन, गोवा. नवीन आवृत्ती २०१३.

48. नार्वेकर, पु. शि. *मृगजळ*. मित्रसमाज प्रकाशन, गोवा. १९८९.

49. नार्वेकर, पु. शि. *विघ्नहर्ता*. गोमंतक, प्रा. लि. १९८६.

50. जोशी, महादेवशास्त्री. *कन्यादान*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७७.

51. जोशी, महादेवशास्त्री. *विराणी*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७७.

52. जोशी, महादेवशास्त्री. *आमचा वानप्रस्थ*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९८३.

53. जोशी, महादेवशास्त्री. *कल्पित आणि सत्य*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७७.

54. जोशी, महादेवशास्त्री. *घररिघी*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७७.

55. जोशी, महादेवशास्त्री. *वेलविस्तार*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, द्वितीयावृत्ती २०११.

56. संपा. कामत, सतीश. *मराठी साहित्य : प्रवाह, प्रकार आणि प्रतिबिंब*. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. २०२२.

57. सोमण, अंजली. *मराठी कथेची स्थितीगती (मराठी कथेचा वाङ्मयीन – सामाजिक अभ्यास)*. प्रतिमा प्रकाशन, पुणे. १९९५.

58. वरखेडे, मंगला. *स्त्रियांचे कथालेखन, नवी दृष्टी, नवी शैली*. साकेत प्रकाशन, दुसरी आवृत्ती २००५.

59. टापरे, पंडित. *कथा : रूप आणि आस्वाद*. नीहारा प्रकाशन, १९९९.

60. संपा. राजाध्यक्ष, विजया., अशोक रानडे. *कथा शताब्दी*. ग्रंथाली प्रकाशन, १९९३.

61. संपा. राजापुरे – तापस, पुष्पलता. *१९८० नंतरचे स्त्री – निर्मित कथनपर साहित्य*. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २०१०.

62. संपा. हातकणंगलेकर, म. द. *श्री. दा. पानवलकर यांची कथा*. साहित्य अकादमी, १९८९.

63. फडके, ना. सी. *लघुकथा लेखन मंत्र आणि तंत्र*. व्हीनस प्रकाशन, पुणे. १९५२.

64. पंडित, अर्चना. *पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे कथाविश्व*. मधुश्री प्रकाशन, पुणे. २००७.

65. संपा. यादव, आनंद., बाबा पाटील. *तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९८१.

66. संपा. यादव, आनंद., द. ता. भोसले. *मराठी ग्रामीण कथा – खंड २*. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. २००२.

67. संपा. हेरोळे, गजानन. *नव्वदोत्तर मराठी कथा: रंग आणि अंतरंग*. गोदा प्रकाशन, औरंगाबाद. २०१८.

68. काजरेकर, गोविंद. *राजन गवस यांचे कथात्म साहित्य*. शब्द पब्लिकेशन, मुंबई. २०१७.

69. जोशी, सुधा. *कथा: संकल्पना आणि समीक्षा*. मौज प्रकाशन गृह, २०००.

70. कांबळे, चिंतामणी सुधाकर. *वासुदेव मुलाटे यांची कथा : रूप व स्वरूप*. निनाद प्रकाशन, पुणे. २०१३.

71. संपा. गोखले, अरविंद. *दि. बा. मोकाशी यांची कथा*. साहित्य अकादमी, १९८८.

72. पावडे, व्यंकटी. *रा. रं. बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा*. इसाप प्रकाशन, नांदेड. २०१३.

73. कोत्तापल्ले, नागनाथ. *नवकथाकार शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास*. इंद्रायणी साहित्य, पुणे. १९८६.

74. पाटील, केशव. *रा. रं. बोराडे यांची कथा : स्वरूप आणि समीक्षा*. सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड. २०१५.

75. अदवंत, म. ना. *मराठी लघुकथेचा इतिहास*. नीहारा प्रकाशन, पुणे. १९९३.

76. बोरकर, कल्पना. *स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण कथा आणि स्त्री*. स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. २०१५.

77. चवरे, रा. गो. *मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह*. सुयश प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती २००३.

78. अदवंत म. ना. "कथा वाङ्मय". *प्रदक्षिणा खंड पहिला*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पुनर्मुद्रण २०२२.

79. संपा. शहा, मृणालिनी, विद्यागौरी टिळक. *आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता*. पद्मगंधा प्रकाशन, पुणे. २००७.

80. रामटेके, भूषण. *जागतिकीकरण आणि साहित्यसमीक्षा*. युरो वर्ल्ड पब्लिकेशन, नागपूर. २०१९.

81. यादव, आनंद. *मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पुनर्मुद्रण २०१६.

82. यादव, आनंद. *ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९७९.

83. शेळके, भास्कर. *मराठी कादंबरीतील प्रादेशिकता*. स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९९७.

84. संपा. गायकवाड, शरद, सुनील शिंदे. *जागतिकीकरण आणि मराठी साहित्य (डॉ. सौ. नलिनी महाडिक गौरवग्रंथ)*. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. २००९.

85. रवींद्र, मनस्विनी लता. *ब्लॉगच्या आरशापल्याड*. शब्द पब्लिकेशन, २०१४.

86. उपाध्ये, बाबुराव. *ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण*. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. २००९.

87. शेवडे, इंदुमती. *मराठी कथा : उगम आणि विकास*. सोमय्या पब्लिशिंग हाउस: मुंबई.

88. Short stories. *The New Encyclopedia Britannica*. Volume 16. Helen Hemingway Benton.

89. गाडगीळ, गंगाधर. *खडक आणि पाणी*. उत्कर्ष प्रकाशन, पुणे. चौथी आवृत्ती. २००३.

90. नेमाडे, भालचंद्र. *टीकास्वयंवर, एकंदर लेख, निबंध, परीक्षणे, मुलाखती वगैरे*. प्रथमावृत्ती. हैदराबाद: साकेत प्रकाशन, १९९०.

91. संपा. जोशी, लक्ष्मणशास्त्री, कुलकर्णी. *मराठी विश्वकोश, खंड ३*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई. प्रथमावृत्ती १९७६.

92. संपा. श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने. *साहित्य : अध्यापन आणि प्रकार, वा. ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ*. मौज प्रकाशन गृह, मुंबई. १९८७.

93. Henry James. “The Art of Fiction” (Orig. publ. 1884), *The House of Fiction*. Ed. Leon Edel, Rupert Hart-Davis, London, 1957.

94. Fernando Ferrara. “Theory and model for the structural analysis of fiction”. *New Literary History*. 5. 1974.

95. फडके, ना० सी०. *प्रतिभासाधन*. आ० ११ वी, देशमुख आणि कंपनी, पुणे. १९७७, पृ० १०१, (पहिली आवृत्ती : १९३१).

96. चवरे, डॉ. रा ग,. *मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह,* द्वितीय आवृत्ती. पुणे : सुयश प्रकाशन, २००३.

97. संपा. जाधव, रा. ग. *मराठी वाङ्मयाचा इतिहास*. खंड सातवा. भाग तिसरा. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे २०१०.

98. संपा. हेरोळे, गजानन. *नव्वदोत्तरी मराठी कथा : रंग आणि अंतरंग*. गोदा प्रकाशन, औरंगाबाद. २०१८

99. नलगे, चंद्रकुमार. *ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास*. रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर. २०१३.

100. मुलाटे, वासुदेव. *ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा*. स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. २००५.

101. संपा. यादव, आनंद, बाबा पाटील. *तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९८१.

102. संपा. यादव, आनंद. *ग्रामीणता साहित्य आणि वास्तव*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९८१.

103. नायक, नारायण भास्कर. *गोमंतकीय मराठी गद्य*. भारतमित्र कार्यालय, रिवण – गोवा. १९७२.

104. सातोस्कर, बा. द. *गोमंतकीय मराठी साहित्याचे आधुनिक शिल्पकार*. क्रीडा व सांस्कृतिक संचालनालय, गोवा, दमन व दीव सरकार, पणजी – गोवा. १९८४.

105. जाधव, रा. ग. *निवडक समीक्षा*. पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००६.

106. गांवस देसाई, प्रमदा. *जी. एं. च्या कथेतील स्त्रीविश्व*. अक्षर दालन, कोल्हापूर. २०२२.

107. कोमरपंत, सोमनाथ. *वाङ्मयीन संदर्भ आणि अवलोकन. मित्र प्रकाशन, गोवा. १९९२.*

108. नेमाडे, भालचंद्र. *साहित्याची भाषा*. साकेत प्रकाशन, औरंगाबाद. १९८७.

109. गंधारे, द. के. *मराठी वाङ्मय प्रकार: स्वरूप, संकल्पना व वाटचाल*. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. २०१७.

110. पाटणकर, रा. भ. *कथाकार शांताराम*. मौज प्रकाशन गृह, गिरगाव-मुंबई. १९८८.

111. संपा. शेकडे, वसंत, सरोज पाटणकर, गीता मांजरेकर, स्नेह देऊस्कर, बालाजी वाघमारे. *निवडक मराठी कथा*. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. २०१२.

112. कानोळकर, बाळकृष्णजी. *आकलनाची अकरावी दिशा*. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. २०१७.

113. जोशी, सुधा. *मराठी कथा: १९४० – २००० एक परामर्श*. मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई. २०१९.

114. मणगुतकर, अशोक. *सुभाष भेण्डे यांच्या कादंबऱ्या*. गोमंतक मराठी अकादमी, गोवा. २००९.

115. संपा. फडके, भालचंद्र. *सहा कथाकार*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुनर्मुद्रण २०१५.

116. संपा. खांडेकर, वि. स. *पाच कथाकार*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पुनर्मुद्रण २०२०.

117. *मराठी कथा: परंपरा आणि नवता : अक्षर यात्रा*, २०१०-२०११. मराठी साहित्य महामंडळ.

118. चिखले, वर्षा. *वैदर्भीय ग्रामीण कथात्म साहित्य : रूप आणि स्वरूप (सन् १९४५-१९९५)*. स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. मार्च २०१३.

119. बागुल, फुला. *निवडक कथा : स्वरूप व समीक्षा*. प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. ऑगस्ट २०१३.

120. जाधव, रा.ग. *मराठीतील कथारूपे*. स्नेहवर्धन पब्लिकेशन हाउस, पुणे. नोव्हेंबर १९९९.

121. अदवंत, म. ना. *मराठी लघुकथेचा इतिहास (इ. स. १८९० ते १९६०)*. नीहार प्रकाशन, ५ एप्रिल १९९३.

122. अदवंत, म. ना. *मराठीतील काही कथाकार (१८९० ते १९४० या कालखंडातील काही कथाकारांच्या कथांचा अभ्यास)* अनमोल प्रकाशन, पुणे. १९७०.

123. बोरकर, कल्पना. *स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण कथा आणि स्त्री*. स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. २०१५.

124. सं. राजपुरे – तापस, पुष्पलता. *१९८० नंतरचे स्त्री निर्मित कथनपर साहित्य*. शब्दालय प्रकाशन, डिसेंबर २०१०.

125. संपा. प्रभुदेसाई, वि. भा., रवींद्र घवी. *गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड पहिला (आरंभ ते १९६१)*. गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.

126. म्हामल, मिलिंद. *गोमंतकीय ग्रंथकारांच्या मराठी ग्रंथांची ग्रंथसूची (आरंभ ते २०१२)*. राजभाषा संचालनालय, पणजी गोवा. २०१४.

127. कोतापल्ले, नागनाथ. *ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध*. स्वरूप प्रकाशन.

128. बनसोड, प्रवीण, शांतरक्षित गावंड. *जागतिकीकरण व ग्रामीण साहित्य*. कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद.

129. कानोळकर, बाळकृष्णजी. *गोमंतकीय साहित्यातील शोधस्थळे*. गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा. २००८.

**आ) प्रबंध**

1. प्रभुदेसाई, विद्या. *१९९० पूर्वीची गोमंतकीय मराठी कादंबरी (एक चिकित्सक अभ्यास)*. जुलै १९९९.
2. पंडित, अर्चन. *पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे कथाविश्व*. एप्रिल १९९९.
3. केळकर, वृंदा. *गोमंतकीय कथा कादंबरी लेखनातील स्त्री व्यक्तिरेखा: एक पर्यालोचन*. मे २०१०.
4. काजरेकर, गोविंद. *राजन गवस यांचे कथात्म साहित्य: एक चिकित्सक अभ्यास*. २००८.
5. नार्वेकर, सुनेत्रा. *अरुण हेबलेकर यांचे कथात्म साहित्य: एक चिकित्सक अभ्यास*. मार्च २०१९.
6. कदम, मीना. *नव्वदीनंतरच्या ग्रामीण कथेतील परिवर्तनवादी विचार: एक अभ्यास*. जानेवारी २०१८.
7. नन्नवरे, भाऊसाहेब मुरलीधर. *१९८० नंतरच्या महानगरीय मराठी कथेचा अभ्यास*. जुलै २०१९.

**इ) स्मरणिका, नियतकालिकें, संशोधन पत्रिका**

1. Timble, Prabhakar. “Migration in Goa: Gains and Concerns.” *Goa Today: Musing Over Migration*, September 2018.
2. Poteker, Govind S. “Don’t Despise the Migrants!” *Goa Today: Musing Over Migration*, September 2018.
3. Almeida, Albertina. “Naphtha Struck!” *Goa Today: Living with Noxious Naphtha*, December 2019.
4. D’Souza, Joe. “Passive Permission for Pollution.” *Goa Today: Living with Noxious Naphtha*, December 2019.
5. Botelho, Afonso Manuel. “Scanning Goa’s Language and Edu Policies.” *Goa Today*, January 2010.
6. Faleiro, Eduardo. “Propping up Primary Education.” *Goa Today: Vague Verdict*, June 2019.
7. Nachinolcar, U. G. “The Confused Goan.” *Goa Today: Vague Verdict*, June 2019.

8. Kamat, Nandkumar. “A Mandate for Stability till 2022.” *Goa Today: Vague Verdict*, June 2019.
9. Azavedo, Gary. “Goan’s Backing for Party-hopping.” *Goa Today: Vague Verdict*, June 2019.
10. Cardozo, Tomazinho. “Wanted – Primary Education in English.” *Goa Today: It’s Konkani – Marathi versus English*, May 2011.
11. Rangel, Jaime. “Shame on You.” *Goa Today: It’s Konkani – Marathi versus English*, May 2011.
12. Fernandes, Alexyz. “Why Not English?” *Goa Today: It’s Konkani – Marathi versus English*, May 2011.
13. D’Souza, Averthanus L. “Goan’s Vision for Goa.” *Goa Today: 44th Anniversary Special*, August 2010.
14. Fernandes, Antonio V. Francisco. “Looking Back at 1960s.” *Goa Today: Madding Mayhem on Mhadei*, February 2018.
15. Kamat, Nandkumar. “The Great Mahadayi Deception.” *Goa Today: Madding Mayhem on Mhadei*, February 2018.
16. Kamat, Nandkumar. “Fruits of Goa’s Liberation.” *Goa Today*, January 2020.
17. Fernandes, Antonio V. Francisco. “Twenty Years of the Twenty-First Century.” *Goa Today*, January 2020.
18. D’Souza, Ralph. “Turn-around in Tourism.” *Goa Today*, November 2010.
19. संपा. कोमरपंत सोमनाथ. *गोमंत – वैखरी*, कोकण मराठी परिषद – गोवा आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य – संस्कृती संमेलन, पणजी – गोवा.

20. संपा. महाले नारायण. *पुनव*, गोमंतक साहित्य सेवक मंडळ आयोजित २८ वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन २०२१, पेडणे – गोवा.

21. संपा. सानप, वसंत. "नव्वदोत्तर मराठी साहित्य – चर्चा आणि मीमांसा." *अभिसरण: नव्वदोत्तर मराठी साहित्य*, मुंडे, शंकर, "१९९० नंतरच्या कथेचा अभ्यास." ISSN-2229-4856.

22. ढोणे, एकनाथ. "१९९० नंतरचे स्त्रीवादी मराठी कथाविश्व." *Golden Research Thoughts*, ISSN 2231-5063, Vol. 4, Issue 4, Oct. 2014.

23. भिसे, सुनील. "१९९० नंतरची मराठी कथा." *Recent Advances in Humanities, Commerce, Management, Engineering, Science & Technology*, ISBN: 978-93-94819-15-3, Vol. III, Oct. 2022.

24. Chiet Editor Ubale Amol Baban. *Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)*, Bi-Monthly Peer-Reviewed Journal, कांबळे, एम. एम. "बदलते ग्रामीण जीवन व नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कथा," Vol. IV, Issues: I, Jan. 15.

25. कानोळकर, बाळकृष्णजी. "जयवंतराव सरदेसाई यांचे सुखद कथाशिल्प !!". *मैत्र*. कथा कविता विशेषांक. फेब्रुवारी २००४.

26. कोमरपंत, सोमनाथ. "मुक्तिपूर्व कालखंडातील गोमंतकीय मराठी कथा". *मैत्र*. मार्च २०००.

27. कानोळकर, बाळकृष्णजी. "मध्यवर्ती मरावी कथेच्या प्रकाशात गोमंतकीय मराठी कथा १९६१-१९८७". *मैत्र*. मार्च २०००.

28. कानोळकर, बाळकृष्णजी. "गोमंतकीय लेखिकांचे मराठी कथालेखन". *मैत्र*. मार्च २००३.

29. कानोळकर, बाळकृष्णजी. "प्रा. मनोहर हिरखा सरदेसाई यांचे कथालेखन". *मैत्र*. एप्रिल २००६.

30. तडकोडकर, सु. म. "गुणी कथाकार म्हामल यांची चतुर्थी". *मैत्र*. एप्रिल २००६.

31. कानोळकर, बाळकृष्णजी. "लक्ष्मणरावांच्या कथेतील नवकथेची प्रसादचिन्हे". *रजतरसाचे चांदणे*. संपा. नारायण महाले. गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे रौप्यमहोत्सवी गोमंतक मराठी साहित्य संमेलन. २४-२१ जानेवारी २००८.

**ई) संकेतस्थळे**


1. कोण्णूर, मयुरेश. "गोवा विधानसभा निवडणूक: 5 मुद्दे जे निकाल ठरवू आणि फिरवू शकतात." *BBC Marathi*, BBC, 12 Feb. 2022, https://www.bbc.com/marathi/india-60351592.amp. Accessed 11th October 2023.
2. "4.03 Lakh Foreign Tourist Visits Goa During January-November 2023." *Press Information Bureau*, Ministry of Tourism, Government of India, 5 Feb. 2024, https://pib.gov.in/PressReleseDetailm.aspx?PRID=2002653. Accessed 11th March 2024.
3. Nanjappa, Vicky. "Goa: How the Russian Drug Mafia Operates." *Rediff.com*, 10 Mar. 2008, https://www.rediff.com/news/2008/mar/10goa2.htm. Accessed 14th March 2024.
4. Nanjapa, Vicky. "Goa: Drugs, Sex, and a Rs. 6K Crore Turnover." *Vicky Nanjapa*, 9 Nov. 2013, https://vickynanjapa.in/2013/11/09/goa-drugs-sex-and-a-rs-6k-crore-turnover Accessed 14th March 2024.
5. Botelho, Afonso. "Casinos in Goa: The Challenge Ahead is to Implement Sustainable Strategies to Minimize Their Ill-Effects." *ResearchGate*, 2018, https://www.researchgate.net/publication/325673858_Casinos_in_Goa_The_Challenge_Ahead_is_to_Implement_Sustainable_Strategies_to_Minimize_Their_Ill-Effects/link/5b1ce38a0f7e9b68b42b5013/download. Accessed 20th March 2024.


**उ) आधारग्रंथ सूची**


1. रायकर, गजानन. *नातालीन*. 'शब्दालय प्रकाशन', श्रीरामपूर. २००५.
2. रायकर, गजानन. *दादुली*. संगम प्रकाशन, मडगांव-गोवा. १९९०.
3. देसाई, गजानन. *कुळागर*. 'प्रियदर्शी प्रकाशन', कोल्हापूर. २००५.

4. देसाई, गजानन. *नियोग*. ‘यशअमृत प्रकाशन’. साखळी – गोवा. २०१७.

5. गांवस, विठ्ठल. *कॅथरीन*. गमभन प्रकाशन, १९९३.

6. गांवस, विठ्ठल. *ओझे*. गोमंतक मराठी अकादमी, पणजी – गोवा. २०१०.

7. गांवस, विठ्ठल. *लवण*. गोमंतक मराठी अकादमी, पणजी – गोवा. २००३.

8. गांवस, विठ्ठल. *फिंगर बाऊल*. कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद. २०१९.

9. नाईक, उदय. *अवसर*. गोमंतक मराठी अकादमी, पणजी – गोवा. २०११

10. नाईक, उदय. *घुमटगाज*. अन्वय प्रकाशन, गोवा. २०१८.

11. ठाकूर, विठ्ठल. *भार*. अजब पब्लिकेशन, कोल्हापूर. २००९.

12. ठाकूर, विठ्ठल. *आवर्त*. अजब पब्लिकेशन, कोल्हापूर. १९८९.

13. पाडलोस्कर, दयाराम. *कागदी होड्या*. विश्वल पब्लिकेशन, कोल्हापूर. २००९.

14. पाडलोस्कर, दयाराम. *खपली निघाल्या नंतर….* ‘देवदया प्रकाशन’, पेडणे – गोवा. २०१६.

15. पाडलोस्कर, दयाराम. *बवाळ*. ‘देवदया प्रकाशन’, पेडणे – गोवा. २०२१.

16. कोलवेकर, ज्ञानेश्वर. *धडपड*. राही प्रकाशन, गोवा. २०१६.

17. कोलवेकर, ज्ञानेश्वर. *भोलानाथ*. मित्र समाज प्रकाशन, २०१३.

18. कोलवेकर, ज्ञानेश्वर. *गावबंधू*. अक्षरमेध प्रकाशन, गोवा. २०१७.

19. नार्वेकर, पु. शि. *कलंदर*. राजहंस वितरण, पणजी, गोवा. १९९८.

20. नार्वेकर, पु. शि. *ब्लॅकीस्ट*. राजहंस वितरण, पणजी गोवा. २००८.

21. नार्वेकर, पु. शि. *मुखवटे*. शारदीय वितरण, पणजी गोवा. २०१२.

22. गावस, चंद्रकांत महादेव. *इभाड*.

23. गावस, चंद्रकांत महादेव. *किस्से पर्यावरणाचे*. बालवाचक चळवळ, होंडा, सत्तरी-गोवा. २००९.

24. तडकोड, सु. म. *डोळ्यातील जग*. केदार प्रकाशन गृह, गोवा. २००७.

25. म्हामल, मिलिंद. *आलकाण्याचो डोंगर*. स्वाती म्हामल, बारदेश – गोवा. २००८.

26. म्हामल, मिलिंद. *मांड*. स्वाती म्हामल, बारदेश – गोवा. २०१४.

27. म्हामल, मिलिंद. *चतुर्थी*. स्वाती म्हामल, बारदेश – गोवा. २००५.

28. महाले, नारायण. *अस्तित्व*. वैजयंती प्रकाशन, सावंतवाडी. २००२.

29. महाले, नारायण. *होमकांड*. गोमंतक मराठी अकादमी, गोवा. २००६.

30. महाले, नारायण. *आमोरी*. अक्षर रचना, गोवा. २००९.

31. महाले, नारायण. *रागावणी*. अक्षर रचना, गोवा. २०११.

32. महाले, नारायण. *होरावणी*. अक्षर रचना, गोवा. २०१३.

33. महाले, नारायण. *घर कौलारू*. अक्षर रचना, गोवा. २०१९.

34. महाले, नारायण. *नाळ*. कैलाश पब्लिकेशन्स्, गोवा. २०२२.

35. अमोणकर, अंजली. *प्राक्तन*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९९५.

*36.* अमोणकर, अंजली. *दुसरी बाजू*. गोमंतक मराठी अकादमी, २००१.

*37.* अमोणकर, अंजली. *देणे संचिताचे*. अंजली प्रकाशन, २०१८.

*38.* अमोणकर, अंजली. *आभाळ आपलं आपलं* गोमंतक मराठी अकादमी, २००९.

39. कारंजकर, प्रतिभा. *कवडसे*. अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर. २०१२.

40. कारंजकर, प्रतिभा. *कथा – कल्पना*. वासुदेव नरहरी कारंजकर, गोवा. २०१८.

41. कारंजकर, प्रतिभा. *कथाप्रतिभा*. राही प्रकाशन, गोवा. २०१५.

42. कुरुंदवाडकर, मेघना. *ती संध्याकाळ*. रश्मी बुक एजन्सी, कोल्हापूर. २०१०.

43. कुरुंदवाडकर, मेघना. *एकटी*. दर्पण पब्लिकेशन, २००८.

44. कुरुंदवाडकर, मेघना. *तिच्या आतल्या चोरकप्यात*. राही प्रकाशन, गोवा. २०२२.

45. कुरुंदवाडकर, मेघना. *भरून आलेलं आभाळ*. राही प्रकाशन, गोवा. २०१८.

46. कुरुंदवाडकर, मेघना. *पायऱ्या*. रश्मी बुक एजन्सी, कोल्हापूर. २०१६.

47. कुरुंदवाडकर, मेघना. *तिच्या आभाळाचा तुकडा*. मित्र समाज प्रकाशन, गोवा. २०१७.

48. कुरुंदवाडकर, मेघना. *झाले मोकळे आकाश*. मित्र समाज प्रकाशन, गोवा. २०२१.

*49.* कुंकळकर, ज्योती. *ओला पदर* गोमंतक मराठी अकादमी, १९९४.

50. सिंगबाळ, सुजाता. *स्नेहबंध*. गुलजार प्रकाशन, गोवा. १९९९.

51. नाडकर्णी, वासंती. *आकाशफूल*. मित्र समाज प्रकाशन, गोवा. नवीन आवृत्ती २०१३.

52. नाडकर्णी, वासंती. *गिनीपिग*. अक्षरमेध प्रकाशन, गोवा. २०१७.

53. नायक, हेमा. *एस्केलेटर आणि इतर कथा*. अपुरबाय प्रकाशन, गोवा. २०२०.

54. देसाई, माधवी. *नकोशी*. माणिक प्रकाशन, कोल्हापूर. द्वितीय आवृत्ती २०११.

55. देसाई, माधवी. *कथा सावलीची*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९९४.

56. देसाई, माधवी. *किनारा*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. २००१.

57. देसाई, माधवी. *शुक्रचांदणी*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. २००२.

58. देसाई, माधवी. *असं म्हणू नकोस*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९९०.

59. देसाई, माधवी. *सागर*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. १९९१.

60. मुरगोडी, गिरिजा. *विधिसंकेत*. दिपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे. २००९.

61. पौडवाल, रेखा. *अंतर्भाव*. श्री बाळकृष्ण पौडवाल, गोवा. २००८.

62. मिरजकर, रेखा. *पाऊलखुणा*. इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे. १९९७.

63. मिरजकर, रेखा. *पांगारा*. प्रियांजली प्रकाशन, पुणे. २००५.

64. दिनकर, आरती. *मृगजळ*. अमृता प्रकाशन, गोवा. २००८.

65. दिनकर, आरती. *वेगळी वाट* मित्र समाज प्रकाशन, २०१२.